कृषीवल
रायगड, सोमवार, दि. २५ मे २०२६
किंमत ४ ₹

## कौटुंबिक वादातून एकाची हत्या

**पनवेल :** कौटुंबिक वादातून काही इसमांनी मिळून एका इसमास जबरी मारहाण केल्याने त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल शहरातील भारतनगर खाडी परिसरात घडली आहे. पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील भारतनगर खाडी परिसरात पूर्ववैमनस्यातून एका इसमाचा खून झाला असल्याची माहिती मिळाली आहे. सलीम अन्वर शेख असे खून झालेल्या इसमाचे नाव आहे. या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिसांचे पथक त्याचप्रमाणे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले. तांत्रिक तपास व परिसरातील गुप्त बातमीद्वारांद्वारे काही इसमांची माहिती मिळाली असून, याप्रकरणी काही जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## जीव धोक्यात घालून घरगणना



(छायाचित्र : संजय गायकवाड)

- ढाकच्या दुर्गम डोंगरकपारीत शिक्षकांची अथक मोहीम यशस्वी
- जनगणनेसाठी जंगलातील खडतर वाट आणि १२ तासांची पायपीट

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

देशाच्या जनगणनेसारख्या राष्ट्रीय कामासाठी शिक्षक किती कठीण परिस्थितीत काम करतात, याचे जिवंत उदाहरण कर्जत तालुक्यातील ढाक परिसरात पाहायला मिळाले. डोंगरकपारी, जंगलवाटा, जीवघेणा प्रवास आणि पावसाशी स्पर्धा करत शिक्षकांनी अखेर ढाक आणि कळकराई परिसरातील १०० टक्के घरगणना पूर्ण केली.

कर्जत तालुक्यातील ढाक हे अतिदुर्गम डोंगराळ भागात वसलेले गाव. येथे पोहोचण्यासाठी आजही वाहनमार्ग नसून, तीन ते चार तास पायी चालत जावे लागते. जनगणनेसाठी गेलेल्या शिक्षकांनी २२ मे २०२६ रोजी सकाळी ५.२२ वाजता डोंगर चढायला सुरुवात केली. तब्बल ४ तास २३ मिनिटांच्या खडतर प्रवासानंतर ते ढाक येथे पोहोचले आणि घरगणनेचे काम पूर्ण केले. मात्र, त्यानंतरही त्यांचा प्रवास संपला नव्हता. ढाक बहिरीच्या कड्याखालील कळकराई या वाडीपर्यंत पोहोचण्यासाठी पुन्हा दीड तासाची जीवघेणी पायपीट करावी लागली. अखेर तब्बल १२ तास ७ मिनिटांच्या अथक परिश्रमानंतर संपूर्ण पान २ वर

> जनगणना हे केवळ सरकारी काम नसून, राष्ट्रीय जबाबदारी आहे. अतिदुर्गम भागात काम करताना अनेक अडचणी आल्या; पण वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे आम्ही हे काम वेळेपूर्वी पूर्ण करू शकलो.
> – वेच्या गावित, पर्यवेक्षक

## खालापूर तहसीलदार चौकशीच्या फेऱ्यात

# धनिकांना 'अभय'?

### आदिवासीच्या जमिनीवर डल्ला?




**अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात भिलवले येथील आदिवासी जमिनीच्या कथित अवैध हस्तांतरण प्रकरणाने महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे. सर्व वारसांची लेखी संमती घेणे बंधनकारक असतानाही खालापूर तहसीलदारांनी कोणतीही संमती न घेता आदिवासी जमीन बिगर आदिवासी व्यक्तीच्या नावे हस्तांतरित केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची दखल घेत महसूलमंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांना चौकशीचे आदेश दिल्याने महसूल विभागात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या पान २ वर

### एकाच जमिनीवर दोन घोटाळे

**पहिला घोटाळा**

आदिवासींच्या नावाने खालापूर येथे बँक खाते उघडून त्यात एक कोटी रुपये जमा करण्यात आले. त्यानंतर दोन कोटी रुपये देण्याच्या बहाण्याने संबंधितांना वाशी येथील एक्सिस बँकेत नेण्यात आले. तेथे नवीन खाते उघडून त्यात दोन कोटी रुपये जमा करण्यात आले. विशेष म्हणजे, संबंधित आदिवासी सर्व व्यवहारांमध्ये अंगठा वापरत असताना एटीएमसाठी आवश्यक असलेली सही त्यांच्या हाताला धरून करून घेण्यात आली. त्यानंतर पासबुक व एटीएम संबंधितांनी स्वतःकडे ठेवून आदिवासींना एक रुपयाही न देता संपूर्ण दोन कोटी रुपये परस्पर काढल्याचा गंभीर आरोप आहे.

**दुसरा घोटाळा**

सदर जमीन विक्रीस जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी दिली असली, तरी परवानगीतील १२ नंबरच्या अटीनुसार कुळ कायद्यातील जमिनीच्या विक्रीसाठी सर्व वारसांची संमती आवश्यक होती. ही जमीन आजोबा-पणजोबांकडून आलेली असून, सध्याचे कसणारे सर्वजण मालक आहेत. वारसांचा स्पष्ट विरोध असल्याची माहिती असूनही तहसीलदार अभय चव्हाण यांनी कर्तव्यात कसूर करत वारसांची संमती न घेता जमीन परस्पर हस्तांतरित केल्याचा आरोप करण्यात येत आहे.

> आदिवासींच्या हक्कांवर डल्ला मारणाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. वारसांची संमती अनिवार्य असताना नियम धाब्यावर बसवून जमीन हस्तांतरण करण्यात आले. आदिवासी अशिक्षित असल्याचा फायदा घेऊन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे.
> – दीपक जाण्या कातकरी

**वे|ध|क**

## धावत्या ट्रॅव्हल्स बसला आग

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील वाशी हायवे ब्रिजवर पुण्याहून गुजरातमधील राजकोटकडे जाणाऱ्या मनीष ट्रॅव्हल्सच्या खासगी बसला अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. बसच्या इंजिनमधून धूर निघत असल्याचे लक्षात येताच चालकाने तात्काळ बस रस्त्याच्या कडेला थांबवून सर्व प्रवाशांना खाली उतरवले. काही क्षणांतच आगीने संपूर्ण बसला वेढा घातला. घटनेची माहिती मिळताच वाशी अग्निशमन दल आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. या आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली.

## दोन दिवसात मान्सून केरळात

**मुंबई :** कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीनंतर आता मुंबईतही मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली आहे. दरम्यान, हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पाच दिवसांच्या विश्रांतीनंतर दक्षिण-पश्चिम मान्सूनने २३ मे रोजी पुन्हा प्रगती सुरू केली आहे. १८ मे रोजी मान्सून अंदमान-निकोबारमध्ये दाखल झाला होता. त्यानंतर त्याची वाटचाल काही दिवस थांबली होती. मात्र, शनिवारी मान्सूनने पुन्हा वेग घेत नैऋत्य आणि आग्नेय अरबी समुद्राचा काही भाग, बंगालच्या उपसागरातील काही क्षेत्र तसेच अंदमान समुद्राचा बहुतांश भाग व्यापला आहे. हवामान विभागाने यंदा २६ मेपर्यंत मान्सून केरळात दाखल होण्याची शक्यता वर्तवली आहे.

## बॉम्बस्फोट प्रकरणात एआयचा गैरवापर

**नवी दिल्ली :** दिल्लीतील लाल किल्ला परिसरात झालेल्या कार बॉम्बस्फोट प्रकरणाच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणातील आरोपींनी बॉम्ब तयार करण्यासाठी आणि दहशतवादी कारवायांसाठी आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय) प्लॅटफॉर्मचा वापर केल्याचे राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या तपासात उघड झाले आहे. आरोपींचे संबंध जागतिक दहशतवादी संघटना 'अल-कायदा'शी असल्याचेही स्पष्ट झाले आहे. एनआयएने या प्रकरणात ७,५०० पानांचे आरोपपत्र विशेष न्यायालयात दाखल केले असून, त्यात अनेक गंभीर खुलासे करण्यात आले आहेत. आरोपींनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आयईडी तयार केले होते.

## उन्हाच्या झळांवर समुद्राच्या लाटांचा गारवा

**नागाव किनाऱ्यावर पर्यटकांची तोबा गर्दी**



(छायाचित्र : अमोल नाईक)

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

राज्यात सध्या तीव्र उष्णतेची लाट असून, तापमानात मोठी वाढ झाली आहे. दुपारच्या वेळेत नागरिकांना उकाड्याच्या झळा सहन कराव्या लागत असल्या तरी उन्हाळी सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांकडे आकर्षित होत आहेत. विशेषतः अलिबाग तालुक्यातील नागाव समुद्रकिनारा पर्यटकांनी गजबजून गेला आहे.

मुंबई, पुणे तसेच राज्यातील विविध भागांतून आलेले पर्यटक कुटुंबासह समुद्रकिनाऱ्यावर सुट्टीचा आनंद घेताना दिसत आहेत. चिमुकले समुद्राच्या लाटांमध्ये खेळण्यात रमले असून, युवक-युवती जलक्रीडा, बोटिंग, बनाना राईड आणि विविध मनोरंजनात्मक उपक्रमांचा आनंद घेत आहेत. काही पर्यटक समुद्रकिनाऱ्यावर फेरफटका मारत तर काही जण नारळपाणी, आईस्क्रीम आणि स्थानिक खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत उन्हाळ्याचा थकवा दूर करताना दिसत आहेत.

नागाव समुद्रकिनाऱ्यावर सकाळपासूनच पर्यटकांची वर्दळ सुरू होत असून, सायंकाळच्या वेळेत गर्दीत अधिक पान २ वर

## सुट्टीच्या दिवशी रस्त्याचे काम बंद

- एमएसआयडीसीचे कार्यकारी अभियंता हिंगेंच्या सूचना
- पर्यटकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागमुरुड या पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या मार्गावर एमएसआयडीसीमार्फत सुरू असलेल्या रस्ता रुंदीकरण तसेच गटारांच्या सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कामामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता, शनिवार, रविवार आणि इतर सुट्टीच्या दिवशी काम बंद ठेवण्याच्या सूचना कार्यकारी अभियंता श्री. हिंगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. या निर्णयामुळे पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

अलिबागमुरुड मार्गावर मागील सहा महिन्यांपासून विविध विकासकामे सुरू आहेत. रस्ता रुंदीकरण, गटारे बांधकाम आणि सिमेंट काँक्रिटीकरणाची कामे अनेक ठिकाणी एकाच वेळी सुरू असल्याने वाहतुकीचा वेग मंदावत आहे. परिणामी, या मार्गावर सातत्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे.

सध्या उन्हाळी सुट्ट्यांचा हंगाम सुरू असल्याने नागाव, काशीद, मुरुड, कोर्लई यांसारख्या समुद्रकिनारी पर्यटनस्थळांकडे पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी वाढली आहे. मुंबई, पान २ वर

## अवैध जांभा दगड खाणी सील

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुक्यात सुरू असलेल्या अवैध जांभा दगड उत्खननाविरोधात तळा महसूल विभागाने धडक कारवाई करत तालुक्यातील सात जांभा खाणी सील केल्या आहेत. पर्यावरणाची हानी, वाढते धुळीचे प्रदूषण आणि नागरिकांच्या आरोग्यावर होत असलेल्या परिणामांच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली.

तालुक्यातील मौजे चरई बुद्रुक येथील गट क्रमांक ७२/५/ड आणि ७२/६ मधील जमिनीवर मे. अविष्कार रिॲलिटी प्रा. लि., मुंबई यांना जांभा दगड उत्खननासाठी परवानगी देण्यात आली होती. कंपनीचे संचालक सुशील नारायण कौशिक यांनी ही जागा दोन वर्षांच्या भाडेकरारावर भोगील भुवण, समाधान लांडे, संदेश



अधिकारी आणि शंकर चव्हाण यांना उत्खननासाठी दिली होती. तसेच वांजलोशी येथील जमीन मालक गौऱ्या सखाराम पवार तसेच चालक राजू चव्हाण आणि मल्लेश राठोड यांना प्रांत कार्यालयाकडून अल्प मुदतीचा गौण खनिज उत्खनन परवाना देण्यात आला होता.

**महसूल विभागाची धडक कारवाई**

मात्र, या जांभा दगड खाणींमुळे परिसरातील पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असल्याची तक्रार स्थानिक ग्रामस्थांनी केली होती. हवेत मोठ्या प्रमाणात धुळीचे प्रदूषण निर्माण होत असून, नागरिकांना श्वसनाचे आजार उद्भवत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला होता. यासंदर्भात तळा तहसीलदारांकडे लेखी तक्रारही दाखल करण्यात आली होती.

दाखल तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेऊन महसूल विभागाने घटनास्थळी पाहणी केली असता शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर चरई बुद्रुक येथील पाच आणि वांजलोशी येथील दोन अशा एकूण सात जांभा खाणींचे पान २ वर

## विजेच्या धक्क्याने कामगार कोसळला

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड शहरातील पथदिवे दुरुस्तीचे काम करत असताना हुंडेकरी इंटरप्राईजेस कंपनीचा कामगार राजू बाईत गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. विजेचा अचानक प्रवाह सुरू झाल्याने ते पोलवरून खाली कोसळले. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, प्राथमिक उपचारांनंतर त्यांना पुढील उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आले आहे.

महाड नगरपालिकेकडून शहरातील पथदिवे व विद्युत देखभाल दुरुस्तीचे काम हुंडेकरी इंटरप्राईजेस या कंपनीला देण्यात आले आहे. शनिवारी दुपारच्या सुमारास राजू बाईत हे महाड शहरात विद्युत स्ट्रीट पान २ वर

**पी.एन.पी. नाट्यमंदिरातून कलावंतांना संजीवनी | स्व. दादा-भाऊंचा वारसा जपत नवे व्यासपीठ**

## नाट्यप्रभा ग्रामीण कलाकारांना पर्वणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागमध्ये सुरू असलेला 'नाट्यप्रभा' ग्रामीण नाट्यमहोत्सव म्हणजे स्थानिक नाट्यकर्मी, साहित्यिक, कलाकार आणि रसिक प्रेक्षकांसाठी एक सांस्कृतिक पर्वणीच ठरत आहे. पी.एन.पी. कलाविकास मंडळ, अलिबाग यांच्यावतीने आणि चित्रलेखा पाटील यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाने रायगडच्या ग्रामीण रंगभूमीला नवसंजीवनी दिली आहे, असे मत डॉ. श्रीकांत पाटील यांनी व्यक्त केले.



कूळ कायद्याचे जनक क्रांतिसूर्य स्वर्गीय नारायण नागू पाटील यांनी समाजकारण, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांचा वारसा पुढे नेत स्वर्गीय प्रभाकर पाटील (भाऊ) आणि स्वर्गीय दत्ता पाटील (दादा) यांनी राजकारणाबरोबरच शिक्षण, कला, क्रीडा, उद्योग आणि रोजगार क्षेत्रात मोलाचे कार्य केले. ग्रामीण भागात व्यायामशाळा, समाजमंदिरे, क्रीडांगणे आणि नाट्यमंदिरे उभारण्यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. याच कार्यामुळे रायगडातील गावागावांत नाटकांची परंपरा रुजली आणि हजारो कलाकार घडलेत, असेही पाटील यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील कलाकारांनी सातत्याने नाटकांमधून विविध भूमिका साकारत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. अनेक कलाकारांनी तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरीय नाट्यस्पर्धांमध्ये यश मिळवले. नाटकांच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न, अंधश्रद्धा, दारूबंदी, शिक्षणाचे महत्त्व आणि समाजजागृतीचे विषय प्रभावीपणे मांडले गेले. ग्रामीण भागात लेखक, दिग्दर्शक, गीतकार, संगीतकार, नेपथ्यकार आणि रंगकर्मी यांची मोठी पिढी या चळवळीतून निर्माण झाली. या परंपरेचा वारसा पान २ वर



## हेटवणे प्रकल्पातील तब्बल ११ पूल गायब

# अधिकारी-ठेकेदाराचे संगनमत?

### लाखोंच्या पूल साहित्य अपहार प्रकरणात तपासाला अडथळे; पोलिसांना सहकार्यच नाही

**| पेण | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील हेटवणे मध्यम प्रकल्पातील पूल साहित्य अपहार प्रकरण दिवसेंदिवस अधिकच गूढ आणि गंभीर बनत चालले आहे. तब्बल ११ पूल गायब झाल्याचे समोर आल्यानंतर या संपूर्ण प्रकरणात अधिकारी आणि ठेकेदार यांच्यातील संगनमताचा संशय अधिकच बळावला असून, तपास यंत्रणेलाही अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याने अनेक प्रश्न अनुत्तरितच आहेत.



इतक्या मोठ्या प्रमाणात पुल साहित्य हटविणे किंवा अपहार करणे हे कोणाच्याही नकळत होणे शक्य नसल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. महाकाय यंत्रसामुग्री, मोठ्या वाहनांची वाहतूक आणि मोठे मनुष्यबळ याशिवाय असा प्रकार घडूच शकत नाही. त्यामुळे हा सर्व प्रकार नियोजनबद्ध पद्धतीने आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या माहितीशिवाय होऊ शकत नसल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कालव्याचे काम करणाऱ्या आर. के. मधानी ॲण्ड कंपनीला ३१ डिसेंबर २०२५ आणि १३ जानेवारी २०२६ रोजी प्रकल्प प्रशासनाकडून पत्र देत पाइपलाइन टाकण्यास अडथळा ठरणारे पूल हटविण्याची परवानगी देण्यात आली होती. त्यामुळे पूल हटविण्याची प्रक्रिया अधिकृत परवानगीनेच सुरू झाली होती का, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, या प्रकरणात पोलीस तपासाला आवश्यक कागदपत्रे, तांत्रिक माहिती आणि संबंधित नोंदी वेळेत मिळत नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे तपासाची गती मंदावली असून, अनेक महत्त्वाचे धागेदोरे अद्याप अस्पष्ट आहेत.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, पूल साहित्याचा अपहार डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यातच झाला असावा; मात्र तक्रार उशिराने दाखल झाल्याने पुरावे गोळा करताना मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. वाहतूक नोंदी, यंत्रसामग्रीचा वापर आणि संबंधितांच्या हालचालींचा तपशील तपास यंत्रणेसाठी महत्त्वाचा ठरत असला, तरी सहकार्याच्या अभावामुळे तपासाला मर्यादा येत असल्याचे बोलले जात आहे.

एकूणच, लाखो रुपयांच्या पूल साहित्य अपहार प्रकरणात अधिकारी, ठेकेदार आणि संबंधित यंत्रणांमधील संभाव्य संगनमताचा संशय अधिक गडद होत असून, तपासातील दिरंगाई आणि मिळत नसलेले सहकार्य यामुळे या प्रकरणातील रहस्य आणखी वाढत आहे.



## डोलवली रस्त्याची पोलखोल

### रस्त्याचे नूतनीकरण करण्यात लोकप्रतिनिधी अपयशी

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

ग्रामीण भागातील गावांना जोडणाऱ्या डोलवली रस्त्याची मान्सूनच्या सुरुवातीलाच दयनीय अवस्था समोर आली असून, मुसळधार पावसामुळे रस्ता चिखलमय झाला आहे.अनेक ठिकाणी मोठमोठी डबकी निर्माण झाल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड वाहतूक होत असल्यामुळे याचाच फटका त्या रस्त्याला बसल्याचे समोर येत आहे.

रस्त्याच्या नूतनीकरणाबाबत वारंवार मागणी करूनही अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.पावसामुळे रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे खड्डे दिसून येत नसल्याने अपघाताचा धोका देखील वाढला आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना मोठी कसरत करत मार्ग काढावा लागत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याच्या दुरुस्ती आणि नूतनीकरणाच्या आश्वासनांची वारंवार घोषणा करण्यात आली; मात्र प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही बदल दिसून आलेला नाही. त्यामुळे रस्त्याचे नूतनीकरण करण्यात लोकप्रतिनिधी अपयशी ठरल्याची टीका नागरिकांकडून होत आहे.

मान्सूनच्या सुरुवातीलाच रस्त्यांची ही अवस्था निर्माण झाल्याने पुढील काळात समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली असून, ग्रामपंचायतीसह लोकप्रतिनिधी यांनी तातडीने लक्ष देऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थ करत आहे.

## रायगड काँग्रेसमध्ये राजकीय भूकंप?

**| उरण | प्रतिनिधी |**

इंडियन नॅशनल काँग्रेस रायगड जिल्हाध्यक्षपदी जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील यांची दोन दिवसांपूर्वी नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर माजी जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी स्वतः पुढाकार घेत नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष डॉ. मनीष पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले होते. त्यामुळे पक्षात सर्व काही सुरळीत असल्याचे चित्र होते.

मात्र, अचानक महेंद्र घरत यांनी काँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याची चर्चा सोशल मीडियावर आणि विशेषतः व्हॉट्सअॅप ग्रुपवर जोर धरू लागल्याने रायगड काँग्रेसमध्ये खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे, पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडे याबाबत विचारणा केली असता त्यांनी बोलण्यास टाळाटाळ केल्याचे समोर आले आहे. प्रदेश सरचिटणीस मिलिंद पाडगावकर यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी माहिती घेतो आणि कळवतो, असे सांगितले. पण, त्यांनी काही कळवले नाही. तर, दुसरीकडे महेंद्र घरत यांच्याशी संपर्क होऊ शकलेला नसल्याने त्यांच्या राजीनाम्याच्या वृत्ताला अधिकृत दुजोरा मिळू शकलेला नाही.

# कर्जत कृषी केंद्राला ‘उत्कृष्ट संशोधन केंद्र’ पुरस्कार

### ■ डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाकडून गौरव

**| खोपोली | प्रतिनिधी |**

डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठातर्फे प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जत यांची ‘उत्कृष्ट संशोधन केंद्र’ पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. दापोली येथील विश्वेश्वरय्या सभागृहात आयोजित विद्यापीठ वर्धापन दिन सोहळ्यात कुलगुरू डॉ. संजय भावे यांच्या हस्ते केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. बी.डी. वाघमोडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.




१४ ऑगस्ट १९१९ रोजी स्थापन झालेले प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जत हे ऐतिहासिक संशोधन केंद्र म्हणून ओळखले जाते. या केंद्राने आतापर्यंत भाताच्या १६ सुधारित आणि ४ संकरित जाती विकसित केल्या आहेत. दरवर्षी ५०० क्विंटलपेक्षा अधिक मूलभूत, पायाभूत, पैदासकार आणि सत्यतादर्शक बियाण्यांचे उत्पादन करून ते विविध बीजोत्पादन संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, संशोधन केंद्रे आणि शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले जाते. संशोधन केंद्राने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून भात संशोधनात मोठी झेप घेतली आहे. स्पीड ब्रीडिंग, डिजिटल ब्रीडिंग आणि जैवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून अवघ्या ६ ते ७ वर्षांत नवीन भात जाती विकसित करण्याचे तंत्र येथे विकसित करण्यात आले आहे. पोहा, मुरमुरे उद्योगासाठी उपयुक्त जाती, पौष्टिक व सुगंधित जाती, रोग व किडींना प्रतिकारक तसेच कमी पावसात तग धरणाऱ्या जाती विकसित करण्यावर भर दिला जात आहे.

याशिवाय नैसर्गिक शेतीसाठी उपयुक्त, कमी मनुष्यबळ लागणाऱ्या पेरभात तंत्रज्ञानावरही संशोधन सुरू आहे. ‘स्टे ग्रीन’ वाण आणि १० टन प्रति हेक्टरपेक्षा अधिक उत्पादन देणाऱ्या संकरित जाती विकसित करण्याचे संशोधनही हाती घेण्यात आले आहे. अद्ययावत प्रयोगशाळा, आण्विक प्रजनन प्रयोगशाळा, जलद पैदास सुविधा आणि ११२.४५ कोटी रुपयांच्या प्रस्तावित ‘महाअन्नपूर्णा’ प्रकल्पाची दखल घेत परीक्षक समितीने या केंद्राची उत्कृष्ट संशोधन केंद्र म्हणून निवड केली. या यशामुळे उत्तर कोंकण विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, ही माहिती केंद्राचे कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी दिली.

## पान १ वरून

### धनिकांना ‘अभय’?

माहितीनुसार, भिलवले, ता. खालापूर येथील सर्वे नंबर १२/३ क्षेत्र २.३३.२० आर ही जमीन जाण्या भाग्या कातकरी व इतर आदिवासी वारसांच्या नावे सातबार उताऱ्यावर होती. या जमिनीच्या हस्तांतरणासाठी अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांनी अटी-शर्तीसह विक्री परवानगी दिली होती.

या आदेशातील सर्वात महत्त्वाची अट क्रमांक १२ मध्ये स्पष्ट नमूद करण्यात आले होते की, सर्व वारसांची लेखी संमती घेतल्याशिवाय जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करता येणार नाही. मात्र, तहसीलदार अभय चव्हाण यांनी या आदेशाचे जाणीवपूर्वक उल्लंघन करत कोणत्याही वारसांची संमती न घेता जमीन बिगर आदिवासी व्यक्ती सिद्धार्थ भल्ला यांच्या नावे हस्तांतरित केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यामुळे आदिवासी वारसांचे हक्क डावलले गेल्याचा आरोप करण्यात आला असून, संबंधित तहसीलदारांना तात्काळ निलंबित करून चौकशीअंती सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणात जमीन विकत घेणारे बिगर आदिवासी खातेदार सिद्धार्थ भल्ला यांनी आदिवासी वारसांची आर्थिक फसवणूक केल्याचाही आरोप आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी ठरवून दिलेल्या तीन कोटी रुपयांच्या व्यवहारापैकी फक्त एक कोटी रुपये आदिवासी खातेदारांना देण्यात आले, तर उर्वरित दोन कोटी रुपये बँक खात्यांमधून एटीएम आणि आरटीजीएसद्वारे स्वतः काढून घेतल्याचा दावा करण्यात आला आहे. आदिवासी वारस अशिक्षित असल्याचा फायदा घेत त्यांच्या सह्या घेऊन बँक खाती उघडण्यात आली आणि एटीएम कार्ड स्वतःकडे ठेवून उत्तर प्रदेश, बिहारसह इतर राज्यांतून पैसे काढण्यात आल्याचा धक्कादायक आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकारामुळे आदिवासींच्या हक्कांवर महसूल अधिकाऱ्यांच्याच संगनमताने डल्ला मारला जातोय का? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.

आदिवासींच्या जमिनी वाचवण्याची जबाबदारी असलेली यंत्रणाच जर जमीन माफियांना मदत करत असेल, तर सामान्य आदिवासींनी न्याय मागायचा कुणाकडे? असा रोष व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल करत आहेत. दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून तहसीलदारांना निलंबित करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. दरम्यान, याबाबत तहसीलदार अभय चव्हाण यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. व्हॉट्सॲपवर संदेश पाठवून विचारणा करूनही उत्तर देण्यात आले नसल्याचे सांगण्यात आले.

या संपूर्ण प्रकरणामुळे महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, आदिवासी हक्कांच्या संरक्षणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### जीव धोक्यात घालून घरगणना

घरगणना १०० टक्के पूर्ण करण्यात यश आले.

काम पूर्ण करून संध्याकाळी ४.२९ वाजता त्यांनी परतीचा प्रवास सुरू केला. दरम्यान, लोणावळा-खंडाळा घाट परिसरात पावसाचे संकेत मिळत होते. जनगणनेत गोळा केलेले महत्त्वाचे दस्तऐवज आणि ऑनलाईन डेटासाठीचे मोबाईल सुरक्षित ठेवण्याचे मोठे आव्हान होते. त्यामुळे जीव मुठीत धरून त्यांनी अवघ्या एका तासात धोकादायक डोंगर उतरत माणगाव वासरे आदिवासी वाडीत आश्रय घेतला. विशेष म्हणजे, घरात पोहोचताच मुसळधार पावसाला सुरुवात झाली. या मोहिमेदरम्यान जंगलातील पायवाटा, खोल दऱ्या, कडे-कपारी आणि सततचा धोका यामुळे अनेक थरारक प्रसंग शिक्षकांना अनुभवावे लागले.

दरम्यान, १९ मे रोजी पहिल्यांदा जनगणनेसाठी गेलेल्या पथकाला ग्रामस्थांनी अर्ध्या वाटेत अडवले होते. टोरांटो प्रकल्पाशी संबंधित कर्मचारी असल्याचा गैरसमज झाल्याने ग्रामस्थांनी गावात प्रवेश नाकारला होता. ही बाब पर्यवेक्षक वेच्या गावित यांनी तहसीलदार धनंजय जाधव यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर तहसीलदार, नायब तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांची बैठक घेऊन जनगणनेचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर ग्रामस्थांनी सहकार्याची भूमिका घेतली आणि अखेर हे राष्ट्रीय काम वेळेपूर्वी पूर्ण झाले.

ढाकच्या पायथ्याशी तुळशी माळ येथे कातकरी समाजाच्या १७ झोपड्या असून, ढाकमध्ये सुमारे ८५ घरांची वस्ती आहे. अनेक घरे मोडकळीस आलेली असून, काही पडीक अवस्थेत आहेत. कळकराई येथेही सध्या केवळ काही झोपड्या, पडीक घरे आणि मंदिर दिसून येते. मात्र, पूर्वी येथे ४० ते ५० ठाकूर समाजाची घरे असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले.

या संपूर्ण मोहिमेत ग्रामपंचायत वदपचे डेटा ऑपरेटर चंद्रकांत वाघचौरे, प्रगणक हेमंत ठाकरे, विश्वास ठाकरे आणि पर्यवेक्षक वेच्या गावित यांनी परिश्रम घेतले.

**पावसाचा सामना करत वाचवले दस्तऐवज**

ढाक आणि कळकराई परिसरातील जनगणना पूर्ण करून परतताना पावसाचे संकेत मिळाल्याने शिक्षकांची धावपळ उडाली. कारण, त्यांच्याकडे जनगणनेचे महत्त्वाचे दस्तऐवज आणि ऑनलाईन डेटा भरण्यासाठी मोबाईल होते. पावसात हे साहित्य खराब झाल्यास संपूर्ण मेहनत वाया जाण्याची शक्यता होती. त्यामुळे अवघड डोंगर उतरत त्यांनी विक्रमी वेळेत खाली पोहोचत दस्तऐवज सुरक्षित ठेवले.

### उन्हाच्या झळांवर समुद्राच्या लाटांचा गारवा

वाढ होत आहे. समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि होमस्टे व्यवसायालाही याचा मोठा फायदा होत आहे. स्थानिक व्यावसायिक, जलक्रीडा चालक आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

उन्हाळी पर्यटनामुळे रायगड जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायाला चालना मिळत असून, नागावसह काशीद, मुरुड, अलिबाग आणि कोर्लई या समुद्रकिनाऱ्यांवरही पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. दरम्यान, पर्यटकांनी समुद्रात उतरताना सुरक्षिततेचे नियम पाळावेत तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन स्थानिक प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

### विजेच्या धक्क्याने कामगार कोसळला

लाईट दुरुस्तीचे काम करत होते. यावेळी अचानक विद्युत प्रवाह सुरू झाल्याने त्यांचा तोल जाऊन ते खाली पडले. स्थानिकांच्या मदतीने त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी मुंबईला रवाना करण्यात आले.

दरम्यान, संबंधित कंपनीतील कामगारांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सुरक्षेच्या आवश्यक उपाययोजनांकडे संबंधित ठेकेदार आणि विद्युत विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

पथदिवे दुरुस्तीचे काम कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने देण्यात आले आहे. कामगारांच्या सुरक्षेची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची आहे. महाड नगरपालिकेकडून अटी व शर्तीसह त्यांना परवानगी देण्यात आली असून, अपघात झाल्यास त्याची पूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील, असे लेखी स्वरूपात घेण्यात आले आहे.

– रंजीत भोसले, अभियंता, महाड नगरपालिका

### सुट्टीच्या दिवशी रस्त्याचे काम बंद

पुणे आणि इतर भागांतून दररोज हजारो पर्यटक या मार्गाने प्रवास करत आहेत. मात्र, रस्त्यावरील कामांमुळे अनेकांना तासन्‌तास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागत आहे. विशेषतः शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनत आहे. नागाव, चौल, रेवदंडा आणि मुरुड परिसरात अनेक वेळा वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. स्थानिक नागरिक, व्यावसायिक तसेच रुग्णवाहिकांनाही या परिस्थितीचा फटका बसत आहे.

या पार्श्वभूमीवर एमएसआयडीसीचे कार्यकारी अभियंता श्री. हिंगे यांनी परिस्थितीचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या. सुट्टीच्या दिवशी रस्त्यावरील कामे थांबवून वाहतूक सुरळीत ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच सुरू असलेली कामे नियोजनबद्ध आणि जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. दरम्यान, स्थानिक नागरिक आणि पर्यटकांकडून या निर्णयाचे स्वागत करण्यात येत असून, पर्यटन हंगामात वाहतूक कोंडी कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### अवैध जांभा दगड खाणी सील

अल्प मुदतीचे गौण खनिज उत्खनन परवाने रद्द करण्यात आले.

यानंतर तळा महसूल विभागाच्या पथकाने संबंधित ठिकाणी जाऊन जांभा दगड खाणी सील करण्याची कारवाई केली. या कारवाईवेळी महसूल विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, महसूल विभागाच्या या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, अवैध उत्खननाविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे बोलले जात आहे.

### नाट्यप्रभा ग्रामीण कलाकारांना पर्वणी

पुढे नेत माजी आमदार जयंत पाटील यांनी ‘पी.एन.पी. नाट्यमंदिर’ उभारण्याचे स्वप्न पूर्ण केले. पूर्वी अलिबागमध्ये ‘सिद्धराज कलामंदिर’ या तात्पुरत्या रंगमंचावर थंडी, उकाडा आणि डासांच्या त्रासात नाटके पाहणाऱ्या रसिकांना आधुनिक सुविधांनी सज्ज असे भव्य नाट्यमंदिर उपलब्ध झाले. ‘अलिबाग कला विकास मंच’ स्थापून जयंत पाटील यांनी स्वतःच्या व्यवसायातून निधी उभारला आणि अवघ्या दोन वर्षांत ‘पी.एन.पी. नाट्यमंदिर’ साकारले.

दोन वर्षांपूर्वी आगीत नाट्यमंदिराचे नुकसान झाले. मात्र, ‘फिनिक्स’ पक्ष्याप्रमाणे हे नाट्यमंदिर पुन्हा नव्या दिमाखात उभे राहिले. ग्रामीण कलाकारांसाठी हे व्यासपीठ व्यापारी तत्त्वावर न चालवता त्यांना मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय भाई जयंत पाटील यांनी घेतला.

यानंतर पी.एन.पी. नाट्यमंदिराची धुरा चित्रलेखा नृपाल पाटील यांच्या हाती सोपविण्यात आली. समाजसेवेचे व्रत घेतलेल्या चित्रलेखाताईंनी ग्रामीण कलाकार, साहित्यिक, गायक आणि कलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबविले. ‘साहित्यप्रभा’ अंतर्गत जिल्हास्तरीय कवी संमेलन, राज्यस्तरीय गीतगायन स्पर्धा, ‘शिवरत्न भूषण पुरस्कार’ वितरण सोहळा तसेच रोजगार मेळावे यांसारखे अनेक उपक्रम राबविण्यात आले.

१८ ते ३१ मे २०२६ दरम्यान सुरू असलेल्या ‘नाट्यप्रभा’ ग्रामीण नाट्यमहोत्सवात सामाजिक आशय असलेल्या विविध नाटकांचे सादरीकरण होत आहे. ‘गजा आला रे’, ‘स्वप्न सुखाचे पाहताना’, ‘वेड्या भावाची वेडी माया’, ‘दीप तुझ्या वंशाचा’ या नाटकांना प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. आगामी काळात ‘अजून अंधार दाटून आहे’, ‘करमरकर हाऊस’, ‘माझा काय गुन्हा’, ‘विठ्ठल विठ्ठल’, ‘विदूषक’, ‘माझं काय चुकलं?’, ‘वेडा वृंदावन’ आणि ‘वारी’ ही नाटके रंगणार आहेत.

प्रत्येक नाट्यप्रयोगानंतर नाट्यसंस्थांचा रोख पारितोषिक आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला जात आहे. त्यामुळे कलाकारांना नवी प्रेरणा आणि उभारी मिळत आहे. मुंबई-पुण्यासारख्या शहरांतील महागड्या नाट्यगृहांमध्ये नाटक पाहण्याचा अनुभव आता अलिबागमध्ये सर्वसामान्य रसिकांनाही मिळत आहे. यानिमित्ताने जुन्या पिढीतील नाट्यकर्मींचे योगदानही अधोरेखित होत आहे. पेझारी-आंबेपूर येथील स्व. सदानंद पाटील, स्व. नागू म्हात्रे, स्व. हिराजी पाटील, स्व. संभाजी पाटील, स्व. सीताराम पाटील, स्व. काशिनाथ पाटील यांच्यासह राजन पांचाळ, प्रकाश म्हात्रे, प्रकाश पाटील, नंदकुमार पाटील, श्रीकांत पाटील, विजया कुडव, गजानन पाटील, स्व. सदू पाटील, प्रकाश खरसंबळे, जुईली टेमकर, श्रेयाली, चंद्रकांत पाटील, आगरी साहित्य विकास मंडळाचे अध्यक्ष आणि नाटककार मोहन भोईर तसेच विजू खोटे, शुभा खोटे, जयंत सावरकर, नाना पाटेकर आणि सदाशिव अमरापूरकर यांसारख्या कलाकारांचे योगदान विशेष मानले जात आहे. या नाट्यमहोत्सवाच्या यशामागे पी.एन.पी. कला विकास मंडळाचे कार्यकारी व्यवस्थापक विक्रांत वार्डे, किशोर म्हात्रे, प्रकल्प वाणी, राजन पांचाळ, प्रतिक पानकर, अमोल नाईक, संदीप जगे, सागर नार्वेकर, देवेंद्र केळुसकर, संकल्प केळकर, दिनेश पाटील, अमोल मिठाग्री, जितेंद्र पाटील, नितेश पाटील, ऋषी पडवळ, अनिष मिठाग्री, यश बनसोडे, अंश म्हात्रे, उपासना घोसाळकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे परिश्रम मोलाचे ठरत आहेत, असे श्रीकांत पाटील म्हणाले.

ग्रामीण रंगभूमीची परंपरा, सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक वारसा जपत ‘नाट्यप्रभा’ महोत्सव रायगडच्या सांस्कृतिक इतिहासात नवा अध्याय लिहीत असल्याची भावना रसिक प्रेक्षकांकडून व्यक्त होत असल्याचे डॉ. पाटील म्हणाले.

दि. : /०५/२०२६

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित मालक १. रजनी रोहिदास पाटील २. सुनिता अशोक घरत ३. सविता रोहिदास पाटील ४. सुभद्रा रोहिदास पाटील ५. स्नेहलता रामनाथ पाटील ६.नितीन रामनाथ पाटील ७. रेश्मा विशाल पाटील ८. स्वप्नाली हरेश कणेकर ९ शिल्पा राजेश ठाकुर १०. केतन प्रभाकर पाटील ११. पुजा प्रशांत कडु १२. चंदना वसंत पाटील १३. निहाल वसंत पाटील १४. हौसा राघो पाटील १५.निर्मला काशिनाथ पाटील १६. दत्ता बबन पाटील १७.दत्ता बबन पाटील १८.निर्मळा काशिनाथ पाटील १९.यशोदा धर्मा पाटील २०. दशरथ राघो पाटील २१. गोपीनाथ राघो पाटील २२. बारकूबाई राघो पाटील २३.सुगंधा गणेश पाटील २४. सुभद्रा रोहिदास पाटील २५. राजेश रोहिदास पाटील २६.अश्विनी रोहिदास पाटील २७. सिध्देश रोहिदास पाटील यांच्या हिश्शातील मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकती असून, आमचे अशिल यांनी सदर मिळकत खरेदीखत करून विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतींचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे : -

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे जांभुळपाडा, तालुका उरण, जिल्हा रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | भूधारणा पध्दती भोगवटदार वर्ग | क्षेत्रफळ हेक्टर | क्षेत्रफळ आर | आकारणी रू. | आकारणी पै. |
|---|---|---|---|---|---|
| २९/२ | १ | ०-४३-५४ | | १० | ४४ |
| | पोटखराबा | ०-१९-६० | | | |
| | एकूण | ०-९४-७० | | १० | ४४ |
| | एकुण मिळकतीपैकी ६३-१४ मिळकतीचा व्यवहार | | | | |

प्राप्त परिस्थितीत वरील नमूद केलेल्या जमिन मिळकतींमध्ये या कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. या तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी या संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ३ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येथून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबदल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ॲड. सुशांत प्र.घरत**
बी.कॉम.एल.एल. बी.
पत्ता ८- शॉप नं. ७०३, ७०४, ७०५,
सातवा मजला, मुनोत वास्तु ईस्कोटिका,
पीएल- १६/३, द कॉर्पोरेट बिजनेस सेंटर,
प्रांत ऑफीस समोर, आश्विनी हॉस्पिटल
जवळ, ओल्ड ठाणा नाका रोड,
पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६
cont.No.९५९४९९३१४१

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. पोखरकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. सुरेश मालु मते व इतर यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| २२ | १२ | ०-५८-०० | ०-५५ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/०५/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफिस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. पाषाणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक शारदाबाई एकनाथ पिंगळे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| ११८ | ४/ब | ०-३०-६० | १-१९ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/०५/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफिस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

## निवडक

### शिहू-बेणसे विभाग अंधारात

**पाली/बेणसे :** शिहू-बेणसे विभागातील सातत्याने खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले असून, विजवीतरण विभागाच्या ढिसाळ व निष्क्रिय कारभाराविरोधात जनतेत तीव्र संतापाची लाट उसळली आहे. दिवस असो वा रात्र, कोणत्याही वेळी अचानक वीज गायब होत असल्याने संपूर्ण विभाग अंधाराच्या विळख्यात सापडत आहे. परिणामी विद्यार्थी, रुग्ण, महिला, लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. शिहू-बेणसे परिसरातील वीज समस्या दिवसेंदिवस अधिकच गंभीर बनली आहे. वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होत असून, ''आमच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका'' असा संतप्त इशारा ग्रामस्थांकडून देण्यात येत आहे. विशेष म्हणजे अजून मुसळधार पाऊस सुरूही झालेला नसताना विजवीतरण विभागाचा गलथान कारभार समोर येत असल्याने जनतेत प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे. रात्रीच्या वेळी वीज गायब होताच डास-मच्छरांचा अक्षरशः कहर सुरू होतो. उकाडा, अंधार आणि मच्छरांच्या उपद्रवामुळे नागरिकांची झोप उडाली आहे. लहान मुले रात्रभर रडत असून, वृद्ध व आजारी नागरिकांची अवस्था बिकट झाली आहे. सर्प, विंचू आणि इतर किटकांची भीती असल्याने अंधारात घराबाहेर पडणेही धोकादायक बनले आहे. स्थानिकांच्या मते, विजबत्ती गुल झाल्यानंतर संबंधित कर्मचारी व अधिकारी ''नॉट रिचेबल'' होत असून, समस्येकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. वारंवार तक्रारी करूनही ठोस उपाययोजना होत नसल्याने जनतेचा संयम आता सुटू लागला आहे.



### वीज समस्येने स्थानिकांसह पर्यटक त्रस्त

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन शहरामध्ये पर्यटक शनिवार व रविवारी मोठ्या प्रमाणामध्ये येत आहेत. श्रीवर्धन पर्यटकांनी भरून गेल्यानंतर शहरामध्ये वीज पुरवठा कायम कमी जास्त दाबाने होत असतो. तर, शहरातील अनेक भागांमध्ये अनेक वेळा वीज पुरवठा खंडित होण्याचा प्रकार देखील घडत असतो. एका ट्रान्सफॉर्मरवर पूर्वी २५ ते ३० एसी होते. अशा प्रत्येक ट्रान्सफॉर्मर वरती आता दीडशेपेक्षा जास्त एसी चालू होत असल्यामुळे वीज पुरवठा कमी व जास्त दाबाने होत असल्याचे पाहायला मिळते. महावितरणचे अधिकारी कोणीही नवीन कनेक्शन घेण्यासाठी गेल्यास एक प्रतिज्ञापत्र घेऊन त्याला नवीन वीज कनेक्शन देत असतात. परंतु, नवीन वीज कनेक्शन देताना या भागामध्ये वीज पुरवठा किती प्रमाणात केला जातो व त्याची क्षमता किती आहे, हे पाहूनच नवीन कनेक्शन देणे गरजेचे आहे. केवळ महावितरणला डिपॉझिटचे पैसे मिळतात व नवीन कनेक्शन सुरू झाल्यावर वीज बिलाचे पैसे मिळतात. परंतु, याचा त्रास सामान्य नागरिकांना होत असतो. अनेक हॉटेल्समध्ये इन्व्हर्टर असला तरीही वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्यानंतर इन्व्हर्टर देखील बंद पडतात. सातत्याने वीज पुरवठा कमी जास्त दाबाने होत असल्यामुळे गणेशाळी येथील महादेव कॉम्प्लेक्समध्ये एका फ्लॅट मधील इन्व्हर्टरला आग लागण्याचा प्रकार देखील घडला आहे. तरी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी वीज पुरवठा योग्य दाबाने होईल व सुरळीत सुरू राहील याबाबत प्रयत्न करावेत, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# विकास संस्था की भ्रष्टाचाराचा खजिना?

## • शेतकऱ्यांच्या अश्रूंवर उभारले भ्रष्टाचाराचे साम्राज्य •उरणच्या जनतेमधून संताप व्यक्त

**। उरण । प्रतिनिधी ।**

सिडको महामंडळ हे विकासाचे प्रतीक आहे की शेतकऱ्यांच्या अश्रूंवर उभे राहिलेले भ्रष्टाचाराचे साम्राज्य, असा संतप्त सवाल उरणच्या जनतेतून विचारला जात आहे. एका बाजूला शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने संपादित करून त्याच जमिनी बिल्डर, दलाल आणि उद्योगपतींना कोट्यवधी रुपयांना विकायच्या. त्यामुळे या जमिनी गमावणारे मूळ शेतकरी आज देशोधडीला लागल्याचे विदारक वास्तव समोर आले आहे.

ज्या शेतकऱ्यांच्या पिढ्यानपिढ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या, त्यांच्यापैकी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच लोक सक्षम राहिले आहेत. उर्वरित शेतकरी मात्र उद्ध्वस्त झाले आहेत. त्यांच्या स्वतःच्या जमिनीवर उभ्या राहिलेल्या प्रकल्पांमध्ये आज त्यांच्याच मुलांना तुटपुंज्या पगारावर सुरक्षा रक्षक म्हणून उभे राहावे लागत आहे. ही केवळ शोकांतिका नसून विकासाच्या नावाखाली झालेली आर्थिक गुलामी असल्याची संतप्त भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, सिडकोतील भ्रष्टाचाराचे आणखी एक धक्कादायक प्रकरण समोर आल्यानंतर संपूर्ण प्रशासनावर संशयाची काळी छाया पसरली आहे. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी रामदास जगताप यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडल्यानंतर सिडको म्हणजे भ्रष्टाचाराचे एटीएम सेंटर असल्याची चर्चा अधिक तीव्र झाली आहे. सिडकोतील शिपायापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांच्या मालमत्तांमध्ये अचानक झालेली प्रचंड वाढ आता चर्चेचा विषय ठरली आहे. नवी मुंबई, द्रोणागिरी, पुणे, सातारा, मुंबई येथे फ्लॅट, बंगले, प्लॉट, फार्महाऊस, बेनामी गुंतवणूक आणि नातेवाईकांच्या नावावरील मालमत्ता पाहता ही कमाई पगारातून की भ्रष्टाचारातून? असा सवाल उपस्थित होत आहे.




सिडकोच्या माध्यमातून नव्याने वसविण्यात आलेल्या द्रोणागिरी नोडमध्ये अनेक बिल्डरांच्या संगनमताने सिडको कर्मचाऱ्यांचे आलिशान टॉवर दिमाखात उभे असल्याची जोरदार चर्चा आहे. धक्कादायक बाब म्हणजे या टॉवरपैकी अनेकांना वापर परवाना नसतानाही खुलेआम वापर सुरू असल्याचे आरोप होत आहेत. नियम सामान्य नागरिकांसाठी आणि मोकळीक बिल्डर अधिकाऱ्यांसाठीच का? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. उरण परिसरात अनधिकृत कंटेनर यार्ड, बेकायदेशीर पार्किंग, ढाबे, आरएमसी प्लांट, सर्व्हीस सेंटर, भंगार माफिया, बंगले, जमीन व्यवहार आणि टक्केवारीच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा मलिंदा सिडकोतील काही कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना मिळत असल्याची चर्चा उघडपणे सुरू आहे. अनेक ठिकाणी नियम धाब्यावर बसवून सुरू असलेले धंदे हे कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत? याकडे आता नागरिकांनी बोट ठेवले आहे.

### टेबलाखालून लाखोंची उलाढाल

उरण तालुका मराठी पत्रकार संघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लेखी निवेदन देत सिडकोतील भ्रष्टाचाराची ईडीमार्फत सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. आज सामान्य नागरिक एका सहीसाठी महिनोन्महिने हेलपाटे मारत आहे, तर दुसरीकडे भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या टेबलाखालून लाखोंची उलाढाल सुरू आहे. विकासाच्या नावाखाली शेतकरी उद्ध्वस्त होत आहेत आणि भ्रष्ट अधिकारी मालामाल होत आहेत. त्यामुळे सिडको ही विकास संस्था नसून भ्रष्टाचाराचा सोन्याचा खजिना बनली आहे, अशी संतप्त चर्चा आता उरण ते नवी मुंबईपर्यंत जोर धरू लागली आहे.

## नागोठण्यात ट्रॉमा केअर सेंटरची गरज

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागरिक आणि उद्योगांसाठी दळणवळणाच्या उत्तम सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी राज्यामध्ये महामार्ग उभारणीची कामे सर्वत्र वेगाने सुरू आहे. याचाच एक भाग असलेल्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर अपघातासारखी दुर्घटना घडल्यास जखमींचा जीव वाचवण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या ट्रॉमा केअर सेंटरची उभारणीच महामार्गावर कुठेही झालेली नसल्याचे वास्तव आहे. माणगाव येथे मंजूर झालेले ट्रॉमा केअरही अद्याप कागदावरच आहे. त्यामुळेच या महामार्गावरील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागोठण्यात ट्रॉमा केअर सेंटरची नितांत गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन बांधकामाची मंजुरी घेताना या जागी ट्रॉमा केअर सेंटरचा प्रस्ताव सादर करावा, अशी




मागणी आता जोर धरत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील गंभीर अपघात, मोटार वाहनांची टक्कर, गंभीर किंवा प्राणघातक दुखापत झालेल्या प्रवाशांच्या उपचारांसाठी सर्व सुविधांनी सुसज्ज, तज्ज्ञ डॉक्टर व प्रशिक्षित कर्मचारी, अतिदक्षता विभाग, त्वरीत शस्त्रक्रियेची सोय, सुसज्ज रुग्णवाहिका असलेले रुग्णालय म्हणजे ट्रॉमा केअर सेंटर होय. तसेच, आपत्कालीन स्थितीत तातडीने सर्च वैद्यकीय उपचार देणारी ही विशेष सुविधा असते. अपघातात मृत्यूचा आकडा कमी करण्यासाठी जखमींना तातडीने उपचाराची गरज असते. अपघात झाल्यापासून ६० मिनिटांचा काळ हा जीव वाचवण्याच्या दृष्टीने 'गोल्डन अवर' मानला जातो. यासाठी ट्रॉमा केअर सेंटर महत्वाची भूमिका बजावताना दिसून येते. मुंबई-गोवा महामार्गावर नागोठणे हद्दीत अनेक धोकादायक अपघात स्थळे आहेत. अपघातांचा हॉट स्पॉट म्हणून कुप्रसिद्ध असलेल्या या ठिकाणांवर अनेकांचे बळी गेले आहेत. त्यातील बहुतांश मृत्यू हे वेळीच उपचार न मिळाल्याने झाले आहेत. नागोठण्याहून पनवेलला सुसज्ज हॉस्पिटलमध्ये पोहचण्यासाठी दीड तासाहून अधिक वेळ लागतो. त्यामुळे जखमींना 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळण्याची शक्यता अत्यंत धूसर होते. त्यामुळे नागोठण्याला ट्रॉमा केअर सेंटर मंजूर झाल्यास माणगाव, कोलाडपासून ते वडखळ पर्यंतच्या अपघातग्रस्त रुग्णांना त्याचा जीव वाचविण्यासाठी एक आशेचा किरण ठरणार आहे.

## फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी

**। उरण । प्रतिनिधी ।**

करंजा बंदर परिसरात सुरू असलेल्या पावसाळी मासेमारी, एलईडी लाईट मासेमारी, अवैध डिझेल पुरवठा, शासनाच्या जागांचा गैरवापर आणि कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. संबंधित मत्स्य व्यवसाय अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाने केली आहे. याबाबत रायगडच्या नव्याने नियुक्त झालेल्या आयुक्तांकडे सविस्तर तक्रार सादर करण्यात आली आहे.



करंजा बंदरामध्ये पावसाळी मासेमारी आणि एलईडी लाईट मासेमारीसाठी लागणारी कथित बोगस कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात संबंधित अधिकाऱ्यांचा थेट सहभाग असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या विषयावर आयुक्त महोदयांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, समाधानकारक उत्तरे देता आली नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे संपूर्ण यंत्रणाच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. करंजा मच्छिमार सोसायटी परिसरात पावसाळी मासेमारीमुळे यापूर्वी जीवितहानीच्या घटना घडल्या, काही बोटी समुद्रात बुडाल्या, तर काही खलाशांचा मृत्यू झाला. मात्र, तरीही संबंधित अधिकाऱ्यांनी कारवाई करण्याऐवजी दिखाऊ तपास करून सर्व प्रकार दडपल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामध्ये काही अधिकारी आणि सोसायटी पदाधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. एलईडी लाईट मासेमारी करून आलेल्या बोटींकडून लाखो रुपयांची कथित वसुली केली जात असल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच, उरण तालुक्यातील काही पेट्रोल पंपांवर ३ ते ४ हजार लिटर क्षमतेचे छोटे डिझेल टँकर ठेवण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच, जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त संजय पाटील यांनी मच्छीमारांसाठी असलेली शासनाची जागा स्वतःच्या पत्नीच्या नावावर घेतल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे.

## मिनीट्रेनची बुकींग नवीन जागेत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ रेल्वे स्थानकातून माथेरान या पर्यटन स्थळाकडे जाण्यासाठी मिनीट्रेन सोडली जाते. या मिनीट्रेनच्या गाडीची तिकीट मागील ५० वर्षे ज्या तिकीट खिडकीवर मिळायची ते तिकीट घर तोडण्यात आले आहे. त्यामुळे नेरळ-माथेरान मिनीट्रेन प्रवास करण्यासाठी काढावी लागणारी तिकिटे आता नवीन तिकीट खिडकीवर काढावी लागत आहेत. जुने तिकीट घर आणि तेथे पर्यटक प्रवासी यांना थांबून राहण्याची असलेली व्यवस्था आता राहणार



नसल्याने पर्यटक प्रवासी यांच्याकडून नाराजी व्यक्त होत आहे.

नेरळ जंक्शन स्थानकातून माथेरान या पर्यटन स्थळासाठी मिनीट्रेन चालविली जाते. १९०९ मध्ये नेरळ माथेरान नेरळ अशी मिनीट्रेन सुरु झाली. त्यानंतर या मिनीट्रेनची तिकीट नेरळ स्थानकात ज्या तिकीट घरामध्ये दिली जात होती ते तिकीट घर आता नाहीसे होत आहे. एकावेळी तीन तिकीट खिडक्यांची व्यवस्था असलेले तिकीट घर मेन लाईन वरील नवीन मार्गिका टाकण्याच्या कामासाठी अडथळा ठरत असल्याने ते तिकीट घर तोडण्यात येत आहे. त्याचवेळी त्या तिकीट घरामध्ये मध्य रेल्वेचे पुस्तकालय होते आणि त्या पुस्तक हे देखील अन्यत्र हलवावे लागत आहे. या तिकीट घराच्या १० मीटर अंतरावरून नेरळ माथेरान मिनीट्रेन गाडी सोडली जात होती. त्यामुळे पर्यटक यांना देखील हे तिकीट घर फायद्याचे ठरत होते. मात्र, आता नेरळ येथून माथेरानसाठी जाणाऱ्या गाडीचे तिकीट मुख्य तिकीट घर येथे मिळत आहे. त्यासाठी फलाट क्रमांक दोन वरील मुख्य बुकिंग कार्यालयात पहिल्या दोन खिडक्या आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. मात्र त्या तिकीट खिडक्यांच्या बाजूला मुंबई आणि कर्जत कडे जाणारे प्रवासी हे देखील तिकीट काढण्यासाठी येत असल्याने तेथे लोकल पकडण्यासाठी धावपळ करणाऱ्या प्रवाशांची धावपळ वाढली आहे.

## सुपेगाव-फणसाड रस्त्याची दुरुस्ती नाहीच

**। कोर्लाई । प्रतिनिधी ।**

पावसाळा ऐन तोंडावर येऊनही मुरुड-रोहा रस्त्यावरील सुपेगाव-फणसाड या दरम्यान दुरुस्ती व डांबरीकरण अद्यापही झालेले नाही. त्यामुळे संबंधित बांधकाम खात्याच्या ठेकेदाराने तोंडाला पाने पुसली तर नाही ना, असा सवाल त्रस्त प्रवासी वर्गातून विचारला जात आहे. हा रस्ता खड्डेमय व अतिशय अरुंद असून, विशेषतः सुपेगाव ते फणसाड प्रवेशद्वारापर्यंतचा अंदाजे ४ ते ५ किमीचा भाग अत्यंत धोकादायक स्थितीत आहे. या रस्त्याच्या



कामात संबंधित बांधकाम खाते ठेकेदाराने तसेच फणसाड अभयारण्य विभागाने रस्त्यालगत असलेली झाडेझुडपे साफ करण्यात आली आहेत; मात्र, मे महिन्याचा अखेरचा आठवडा सरत आला, पावसाळा तोंडावर आला तरी अद्याप रस्त्यावरील खड्डे बुजवून डांबरीकरण करण्यात आले नाही. दरम्यान, कृषीवलच्या प्रतिनिधीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ठेकेदाराशी संपर्क साधला असता, मंगळवारी (दि.१९) रस्त्यावरील खड्डे व डांबरीकरण काम करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. मात्र, रविवार उजडला तरी रस्त्याच्या डांबरीकरणाला सुरूवात झालेली नाही. त्यामुळे नेमक्या कोणत्या मंगळवारी काम सुरू करणार, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

**कडधान्यांच्या उत्पादनात घट** **अवकाळीच्या फटक्यामुळे क्षेत्र घटले**

## वालाने खाल्ला भाव

**। धम्मशील सावंत ।**
**। पाली/बेणसे ।**

अवकाळी पावसाचा फटका व घटते क्षेत्रामुळे कडधान्ये उत्पादनात घट झाली असल्याने जिल्ह्यात कडधान्याचे भाव वधारले आहेत. मागील वर्षी १५० रुपये किलो मिळणारे गावठी वाल सध्या २५० ते ३०० रुपये किलोने मिळत आहेत.

जिल्ह्यात कडधान्यामध्ये सर्वात जास्त म्हणजे जवळपास साडेतीन ते ४ हजार हेक्टरवर वालाची लागवड केली जाते. त्यानंतर मुग, मटकी, चवळी, तूर इत्यादी कडधान्यांची लागवड केली जाते. ग्राहकांची गोडे व कडवे वाल, लहान चवळी आणि गावठी व निडीच्या वालांना अधिक पसंती आहे. पावसाळ्यासाठी ग्रामीण भागासह शहरातील अनेक जण कडधान्यांची खरेदी करतात. बाजारात किरकोळ व घाऊक दरात कडधान्य उपलब्ध आहेत.



### निडीच्या वालांना ग्राहकांची मागणी


मुंबई-गोवा महामार्गावरील निडी गावचे रुचकर, स्वादिष्ट व मोठ्या वालाच्या शेंगा प्रसिद्ध आहेत. या वालांना ग्रामीण व शहरातील ग्राहकांची अधिक पसंती असते. शिवाय छोट्या गावठी वालांना देखील पसंती देतात. मात्र, सध्या निडीचे वाल उपलब्ध नाहीत.

मात्र, यंदा लांबलेला पाऊस तसेच अवकाळी पावसामुळे कडधान्य पिकांचे खूप नुकसान झाले. याशिवाय नारू रोगाचा परिणाम देखील उत्पादन घटण्यावर झाला आहे. तसेच, अनेक शेतकऱ्यांनी कडधान्य शेतीकडे पाठ फिरवली असल्याने कडधान्य शेतीचे क्षेत्र देखील घटले आहे. या सर्वांचे एकूणच परिणाम कडधान्य किमती वाढीवर झाला आहे.

> **सध्या बाजारात ग्राहकांची कडधान्य खरेदीसाठी लगबग सुरु आहे. गावठी कडधान्यांना अधिक मागणी असते. अवकाळी पावसामुळे उत्पादन घाटल्याने यावर्षी कडधान्यांचे भाव मात्र वाढले आहेत. याशिवाय नारू रोगाचा प्रतिकूल परिणाम देखील झाला आहे. शेतकऱ्यांकडे आता मालच शिल्लक राहिला नसल्याने मागणी असूनही पुरवठा करणे अवघड जात आहे.**
> **- भद्रेश शहा, घाऊक व किरकोळ कडधान्य विक्रेते**

### कडधान्यांचे सध्याचे भाव

वालः २५० ते ३०० रु. किलो.
चणाः १०० रु. किलो.
तुरडाळः १०० ते १२० रु.किलो.
मुगडाळः १३० रु. किलो.
पावटाः १६० रु. किलो.
मटकीः २५० रु. किलो.
हिरवा वाटाणाः १०० रु. किलो.
काळा वाटाणाः १०० रु. किलो.
मसुरः ८० रु. किलो.
मसुर डाळः १०० रु. किलो.
मुगः १२० ते १०० रु. किलो.
तुर डाळः ८० रु. किलो.
वालाची डाळः २०० ते ३००रु.किलो.
उडीदः १०० रु. किलो.
चवळीः १२० रु. किलो.
नाचणीः ६० रु. किलो.
वरीः ८० रु. किलो.



## चोरट्या दरवाढी

सरकारचे चोरटे उद्योग सुरू झाले आहेत. दहा दिवसात तीन वेळा पेट्रोल व डिझेलची दरवाढ केली गेली आहे. सीएनजीही वाढला आहे. अजून थोडी थोडी करून पाच-सात वेळा तरी ही वाढ होईल. एकूण सुमारे पंधरा रुपये तरी वाढतील अशी शक्यता आहे. नागरिकांना थेटपणे सामोरे जाण्याचे धैर्य नसल्याने हे केले जात आहे. गेली काही वर्षे जगाच्या बाजारात क्रूड तेलाचे भाव वाढले तरी आम्ही ते वाढू दिले नाहीत अशी बतावणी सरकारचे प्रवक्ते करीत असतात. त्याला भुलून त्यांची भक्त मंडळीही तसेच बोलत असतात. मोदी सरकारने आम्हाला आजवर महागाईपासून वाचवले, आता इराण युद्धामुळे भाववाढ अपरिहार्य आहे असे सरकारचे समर्थन करणारी वक्तव्ये टीव्हीच्या बातम्यांमध्ये लोक करीत आहेत. या भाववाढीच्या विरोधात कोठेही मोठे आंदोलन उभे राहू शकलेले नाही. याचे कारण हेच आहे की, जनतेला खोटे बोलून गुंगवण्यात या सरकारला यश आले आहे. इराण युद्धामुळे क्रूड तेल व गॅसचा पुरवठा खंडित झाला आहे हे खरे आहे. जगाच्या बाजारात त्यांचे भाव काही काळ वाढले होते हेही सत्य आहे. मात्र सरकार भाववाढ करण्यासाठी ही जी सबब पुढे करीत आहे ती मात्र खोटी आहे. याचे कारण मुळात इतके दिवस सरकारने जगात भाव वाढूनही देशात मात्र ते रोखून धरले होते हा दावाच खोटा आहे. २०१९-२० मध्ये जागतिक बाजारात क्रूड तेल ६१ डॉलर प्रतिबॅरल असताना भारतात पेट्रोल ७२ रुपयांना मिळत होते. २०२०-२१ मध्ये जगात क्रूड तेल ४४ डॉलरपर्यंत खाली घसरले. पण भारतात मात्र पेट्रोलचा दर ८१ करण्यात आला. म्हणजे जगात तेल घसरूनही भारतात दर ९ रुपयांनी वाढवले गेले. त्यानंतरही ही कृत्रीम भाववाढ कायम ठेवली गेली व मुंबईत बराच काळ पेट्रोल १०५ रुपयांना मिळते. या सर्व काळात भारतातल्या सरकारी तेल कंपन्याला विक्रमी नफे झाले व ते पैसे अंतिमतः सरकारकडेच वळते झाले.

### तेव्हा जनतेला फायदा नाही

२०१३ मध्ये मनमोहनसिंग असताना क्रूड तेलाचे भाव १०५ डॉलर प्रतिबॅरल असे होते. त्यानंतर २०१४ मध्ये मोदी सत्तेत आल्याच्या आसपास हे दर ८४ डॉलरपर्यंत खाली आले. तेव्हापासून गेल्या ११ वर्षांमध्ये म्हणजे २०२५ पर्यंत क्रूड तेल कधीही १०० डॉलरच्या वर गेलेले नाही. उलट फक्त एकदाच, युक्रेन युध्दामुळे २०२२-२३ मध्ये ते ९० च्या वर गेले. बाकी वर्षे ते अविश्वनीय अशा खालच्या पातळीवर राहिले. २०१५ व १६ या दोन वर्षांमध्ये ते ५०च्याही खाली गेले होते. पुन्हा कोविडच्या वर्षात हेच घडले. मधल्या काळात किमान तीन वर्षे हा दर साठच्या खाली आणि उरलेली वर्षे सत्तरच्या आसपास राहिला. खरे तर भारतीयांना या स्वस्ताईचा फायदा मिळायला हवा होता. पण मोदी सरकारने ते होऊ दिले नाही. आपल्या देशातील पेट्रोलच्या दरांची थेट जागतिक क्रूड तेलाच्या दरांशी सांगड घालणारे धोरण अस्तित्वात आहे. त्यामुळे पूर्वी जेव्हा जेव्हा हे दर जगात चढे झाले तेव्हा इथले दर भडकले. तेव्हाचा विरोधी पक्ष असलेल्या भाजपने त्याबाबत आंदोलने केली. पण भाजपच्या सरकारच्या काळात हे दर जेव्हा कमी झाले तरीही त्याचा लाभ लोकांना मिळाला नाही. मनमोहनसिंग राजवटीच्या शेवटच्या वर्षांमध्ये डॉलरच्या तुलनेत रुपया सातत्याने घसरत होता. त्यावेळी नरेंद्र मोदी मनमोहनसिंगांची टर उडवत होते. आज आपला रुपया वेगाने घरंगळत चालला आहे. विशेष म्हणजे याचा इराण युध्दाशी काहीही संबंध नाही, हे मुद्दाम सांगायला हवे. २०२१ मध्ये एका डॉलरसाठी ७४ रुपये मोजावे लागत होते. २०२५ मध्ये रुपया सोळाने घसरून ९० रुपये प्रति डॉलर झाला. इराण युद्ध ही गेल्या तीन महिन्यांची घटना आहे. पण हे घसरणे आधीपासून चालू आहे. पण एकेकाळी मनमोहनसिंग यांना शिव्या घालणारी जनता या घसरणीबाबत मात्र अगदी गप्प आहे. आपल्याला बसणाऱ्या फटक्यांबाबत आणि समोर येणाऱ्या आकड्यांबाबत तिने आंधळेपणा धारण केला आहे.

### अंबानी, अदानींना सांगा

आपल्या देशात क्रूड तेलाच्या विहिरी अगदी कमी आहेत. मुख्यतः आयातीवरच आपण अवलंबून आहोत. या आयातीसाठी परकीय चलन म्हणजेच डॉलर मोजावे लागतात. जसजसे भाव वाढतात तसतसे अधिक डॉलर खर्ची पडतात व आपला रुपया खाली जातो. त्या प्रमाणात आपली दुसरी निर्यात वाढली तर रुपया सावरू शकतो. पण तेलाची आयात आपल्या परकी चलनाच्या साठ्यातला जवळपास २५ टक्के हिस्सा खात असते. त्यामुळे कितीही निर्यात केली तरी ती कमीच पडते. मात्र या संदर्भातही मोदी सरकारचे रेकॉर्ड अत्यंत खराब आहे. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेत आले तेव्हा आपण ७७ टक्के क्रूड तेलाची आयात करीत होतो. आता ही आयात ९० टक्क्यांवर गेली आहे. आपल्या अर्थव्यवस्थेत सुधारणा झाली म्हणून ही वाढ झालेली नाही. तर खासगी कंपन्यांच्या फायद्यासाठी ती झालेली आहे. रिलायन्ससारख्या कंपन्या परदेशातून क्रूड तेल आणतात आणि येथे शुध्दीकरण प्रकल्पात शुध्द करून त्यापासून पेट्रोल, डिझेल, प्लास्टिक इत्यादी उत्पादने तयार करतात. ही उत्पादने निर्यात करून ते भरपूर नफा मिळवतात. मात्र तो मिळवण्यासाठी मुळात कच्च्या तेलासाठी बहुमूल्य परकी चलन खर्ची घालावे लागत असते. गेल्या काही वर्षात आयातीत झालेली वाढ ही मुख्यतः याच कंपन्यासाठी आहे. एकूण खर्चाच्या सुमारे तीस टक्के परकीय चलनाचा खर्च या कंपन्यांच्या क्रूड तेल आयातीसाठी होते. अलिकडेच नरेंद्र मोदी यांनी देशातील लोकांना काटकसरीचे आवाहन केले. परदेशी प्रवास टाळा, सार्वजनिक वाहनाने प्रवास करा असे ते म्हणाले. पण रिलायन्स वगैरेंच्या कच्च्या तेलाच्या आयातीत घट करूनही ही बचत करता येऊ शकते. त्याविषयी मात्र ते बोलत नाहीत. रुपयाची घसरण रोखण्याची सर्व जबाबदारी सामान्य नागरिकावर टाकण्यात आली आहे. वास्तविक हा नागरिक अगदीच नाइलाज म्हणून खासगी कारने वगैरे प्रवास करतो. परदेशात सुट्टीसाठी विनाकारण फिरायला जाण्याचे तो स्वप्नही पाहू शकत नाही. आणि, सोन्याची खरेदी ही आयुष्यात कधीमधी, केवळ लग्नाच्या निमित्ताने वगैरे होणारी बाब आहे. अंबानी, अदानींपासून ते उगाच गंमत म्हणून हॉटेलिंगवर दर आठवड्याला हजारो रुपये आणि दरवर्षी सुट्ट्यातील भटकंतीवर लाखो रुपये उडवणाऱ्या भाजपच्या भक्तांना मोदींनी आपला उपदेश करायला हवा. शिवाय आपल्या आचरणातूनही ते दाखवायला हवे. मोदींचे आवाहन होताच आपल्या देवेंद्र फडणवीसांपासून इतर अनेक नेत्यांनी मोटारसायकल वगैरे वापरण्याची नाटके केली. पण ती दोन दिवसही टिकली नाहीत. लोकां सांगे ब्रह्मज्ञान असा हा सर्व प्रकार आहे. याची मोदी सरकार व भाजपलाही जाणीव आहे. त्यामुळेच चोरट्यासारख्या दरवाढी केल्या जात आहेत.

**विचार**

# मोल्टबूक: एआय एजंटांचा समाज

*'मोल्टबूक'सारख्या सामाजिक नेटवर्कमध्ये केवळ एआय एजंटच पोस्ट करू शकतात, प्रतिक्रिया देऊ शकतात आणि समुदाय तयार करू शकतात. मानव कर्मचारी फक्त पाहू शकतात, सहभागी होऊ शकत नाहीत. अशा व्यासपीठांमुळे स्वयंचलित निर्णय प्रक्रिया वाढेल, एजंट एकमेकांशी संवाद साधतील, विश्लेषण करतील आणि काही प्रमाणात स्वतः निर्णय सुचवतील; पण यामुळे मानवाची जबाबदारी आणखी वाढली आहे.*




डॉ. दीपक शिकारपूर

आजचा काळ वेगाने बदलत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आपल्या जगण्याच्या पद्धतीत मोठा बदल झाला आहे. या बदलांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा मोठा वाटा आहे. मोल्टबूक हे एक आधुनिक डिजिटल व्यासपीठ कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सेवा आणि साधने उपलब्ध करून देते. या व्यासपीठाचा मुख्य उद्देश म्हणजे व्यक्ती, विद्यार्थी, शिक्षक, उद्योजक आणि संस्था यांना माहिती, लेखन, विश्लेषण आणि संवादासाठी मदत करणे. हे व्यासपीठ वापरकर्त्यांना सोप्या पद्धतीने प्रश्न विचारण्याची आणि त्यावर त्वरित उत्तर मिळवण्याची सुविधा देते. हे पूर्णपणे कृत्रिम बुद्धिमत्ता एजंटसाठी तयार केलेले सामाजिक जाळे आहे. या ठिकाणी माणसांना प्रवेश नाही. येथे फक्त यंत्रे एकमेकांशी संवाद साधतात. म्हणजेच संगणक प्रणाली, स्वयंचलित कार्यक्रम आणि बुद्धिमान सॉफ्टवेअर हेच एकमेकांशी चर्चा करतात, माहितीची देवाणघेवाण करतात आणि प्रतिसाद देतात. 'ओपनक्लॉव' नावाच्या मुक्त-स्रोत एआय एजंट फ्रेमवर्कचा वापर करून अनेक एआय एजंट तयार झाले. हे एजंट्स ईमेल व्यवस्थापन, चॅट प्रतिसाद, कामांचे नियोजन अशी विविध कामे करू शकतात. हे व्यासपीठ मानवी प्रोग्रामरने तयार केले असले तरी त्यात त्याने स्वतःच्या एआय सहाय्यकाचा वापर करून 'मोल्टबूक'ची प्रणाली आणि काही कामे एजंटवर सोपवली आहेत. हे एक सामाजिक नेटवर्क असून तिथे केवळ एआय एजंटच पोस्ट करू शकतात, प्रतिक्रिया देऊ शकतात आणि समुदाय तयार करू शकतात. मानव कर्मचारी फक्त पोस्टस पाहू शकतात, चर्चेत सहभागी होऊ शकत नाहीत. येथे विविध एआय एजंट्स एकमेकांशी संवाद साधू शकतात. एखादा एजंट माहिती गोळा करतो, तर दुसरा त्याचे विश्लेषण करतो. त्यामुळे कामाची गती वाढते.

लाँच होताच 'मोल्टबूक' त्वरित लोकप्रिय झाले आणि काहीच दिवसांमध्ये लाखो एजंट्स या नेटवर्कवर सक्रिय झाले. परंपरागतपणे, एआय मॉडेल हे मानवी वापरकर्त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देतात. परंतु मोल्टबूक हे एआय एजंट समानार्थी संवाद आणि माहिती देवाणघेवाण करू शकतील, असा विचार करून बनवले गेले. यामुळे एजंट्स एकमेकांना कोड, ज्ञान, संशोधन शेअर करू शकतील आणि त्यांना समस्यांचे निराकरण आणि समूहात विचार-चर्चा करण्याची संधी मिळेल. मोल्टबूकचा उद्देश केवळ संवाद नाही, तर एआय एजंटमध्ये सामूहिक समन्वय, व्यवस्थापन आणि सहयोगाचे नमुने तयार होणे हा आहे. तिथे एजंट्स स्वतः प्रश्न विचारू शकतात, उत्तर देऊ शकतात, उत्तरांचे मूल्यांकन करू शकतात आणि सुसंगत माहिती तयार करू शकतात. मोल्टबूक हा एक नविन प्रयोगात्मक पॉइंट आहे, जिथे एआय एजंट्स स्वतः संवाद साधतात आणि सूचनांचे आदानप्रदान करतात. याचा उदय म्हणजे मानवी-एआय संवादाच्या पुढील टप्प्याचा प्रारंभ मानला जात आहे. इथे मशीन स्वतःचे 'सोशल नेटवर्क' वापरून चर्चा करणे, समस्या सोडवणे, आणि सल्ला देणे शिकत आहेत. या व्यासपीठाची खास वैशिष्ट्ये अशी आहेत की येथे संवाद पूर्णपणे यंत्र ते यंत्र अशा स्वरूपात होतो. प्रत्येक एजंट हा स्वतंत्रपणे कार्य करणारा संगणकीय घटक असतो. त्याला काही उद्दिष्टे दिलेली असतात, तो माहिती गोळा करू शकतो, विश्लेषण करू शकतो आणि त्यानुसार प्रतिक्रिया देऊ शकतो. मोल्टबूकवर असे अनेक एजंट्स एकत्र येतात आणि परस्परसंवाद साधतात.

या संवादांदरम्यान एक विलक्षण गोष्ट दिसून आली. हे स्वयंचलित एजंट्स फक्त साधे प्रश्नोत्तर करत नव्हते, तर एकत्रितपणे विचार करायला लागले होते. म्हणजेच एका एजंटने दिलेल्या माहितीवर दुसरा एजंट प्रतिक्रिया देत होता, त्यात सुधारणा करत होता, तिसरा एजंट नवीन दृष्टिकोन मांडत होता. अशा प्रकारे सामूहिक विचार प्रक्रिया सुरू झाली. काही वेळाने जाणवले की हे एजंट्स केवळ स्वतंत्रपणे काम करत नाहीत, तर ते एकमेकांशी समन्वय साधत आहेत. ते स्वतःचे गट तयार करत आहेत, समान प्रकारची उद्दिष्टे ओळखत आहेत आणि त्यानुसार योजना आखत आहेत. यामुळे असे भासू लागले की त्यांच्यात सामायिक ध्येय निर्माण होत आहेत. उदाहरणार्थ, काही एजंटांना माहिती व्यवस्थापनाचे कार्य दिले असेल, तर ते एकत्र येऊन माहिती अधिक कार्यक्षम पद्धतीने कशी हाताळता येईल यावर चर्चा करू शकतात. काही एजंट विश्लेषणात तज्ज्ञ असतील, तर काही निर्णय प्रक्रियेत आपापली क्षमता वापरून सामूहिक निष्कर्ष काढू शकतात. मोल्टबूक व्यासपीठाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याची संवादात्मक रचना. वापरकर्ता मजकुराच्या स्वरूपात प्रश्न विचारू शकतो आणि प्रणाली त्यावर आधारित माहिती, स्पष्टीकरण, निबंध, अहवाल किंवा मार्गदर्शन देते. ही प्रणाली मोठ्या प्रमाणातील माहितीचे विश्लेषण करून सुसंगत आणि सोपे उत्तर तयार करते. त्यामुळे वेळ वाचतो आणि काम अधिक कार्यक्षमतेने होते.

ही घटना महत्त्वाची का आहे? कारण पारंपरिक पद्धतीत कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली स्वतंत्रपणे कार्य करतात आणि मानवांच्या सूचनांवर अवलंबून असतात. पण इथे असे दिसते की एजंट्स स्वतःहून संघटित होत आहेत आणि एकत्रित विचार करत आहेत. हे तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मोठे पाऊल मानले जाऊ शकते. तथापि, यामुळे काही प्रश्नही निर्माण होतात. एजंट सामूहिक ध्येय तयार करत असतील, तर ती ध्येये कोण ठरवते, ती पूर्णपणे मानवी नियंत्रणाखाली आहेत का, त्यांनी स्वतःची उद्दिष्टे आखली तर त्याचा परिणाम काय होईल, अशा परिस्थितीत पारदर्शकता, नियंत्रण आणि नैतिकतेचा विचार करणे आवश्यक आहे.

अशा व्यासपीठांमुळे स्वयंचलित निर्णय प्रक्रिया वाढेल. एजंट एकमेकांशी संवाद साधून माहितीची देवाणघेवाण करतील, विश्लेषण करतील आणि काही प्रमाणात स्वतः निर्णय सुचवतील. उद्योग, बँकिंग, आरोग्य, वाहतूक आणि प्रशासन यामध्ये जलद आणि अचूक निर्णय घेणे शक्य होईल. एजंट सामूहिक विचार आणि समन्वय साधू लागले तर मोठ्या प्रकल्पांचे नियोजन आणि अंमलबजावणी अधिक वेगाने होऊ शकते. उदाहरणार्थ, पुरवठा साखळी, उत्पादन नियोजन किंवा आपत्ती व्यवस्थापनात यंत्रे एकत्रितपणे काम करू शकतील. हे मानव आणि यंत्र सहकार्याचे नवे मॉडेल ठरू शकेल. भविष्यात पूर्णपणे यंत्रप्रधान व्यवस्था होण्याऐवजी मानव आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचे सहकार्य अधिक महत्त्वाचे ठरेल. यंत्र विश्लेषण करेल, पण अंतिम निर्णय आणि नैतिक जबाबदारी मानवाकडे राहील.

याचा मानवी नोकऱ्यांवर काही प्रमाणात परिणाम होऊ शकेल. म्हणजे काही नोकऱ्या कमी होतील. विशेषत: डेटा नोंदवणे, प्राथमिक विश्लेषण, साधे ग्राहक सेवा कार्य, पुनरावृत्तीची कार्यालयीन कामे यांसारखी कामे स्वयंचलित होऊ शकतात. त्यामुळे अशा प्रकारच्या नोकऱ्यांची गरज कमी होऊ शकते. पण त्याचबरोबर काही नवीन नोकऱ्या निर्माण होतील. तंत्रज्ञान व्यवस्थापन, प्रणाली देखभाल, माहिती सुरक्षा, नैतिक देखरेख, प्रशिक्षण आणि निरीक्षण यांसारख्या क्षेत्रात नवीन संधी निर्माण होतील. लोकांना नवीन कौशल्ये शिकावी लागतील. फक्त यांत्रिक कामांपेक्षा सर्जनशीलता, समस्या सोडवण्याची क्षमता, मानवी संवाद कौशल्य आणि नेतृत्व यांना अधिक महत्त्व मिळेल. बदल स्वीकारणारेच पुढे जातील. मोल्टबूकसारख्या व्यासपीठाचे भवितव्य आशादायक आहे, पण ते संतुलित पद्धतीने विकसित करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे साधन आहे, पर्याय नाही. योग्य नियम, नैतिकता आणि मानवी नियंत्रण ठेवले गेले तर ते मानवाच्या प्रगतीस मदत करू शकते. अन्यथा, नोकऱ्यांवर आणि समाजावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. भविष्य हे पूर्णपणे यंत्रांचे नसून, मानव आणि यंत्र यांच्या समन्वयाचे असेल. समाज बदलाशी जुळवून घेणाराच यशस्वी ठरेल.

deepak@deepakshikarpur.com

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

**चर्चा आजची**

# कॉक्रोच जनता पार्टी, नवी जेनझी क्रांती?




वैष्णवी वाडकर

गेल्या आठवड्याभरापासून सोशल मीडियावरील एक नवा पक्ष चर्चेचा विषय ठरला आहे. या पक्षाचे नाव आहे कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी) भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका निकालचा सुनावणीदरम्यान बेरोजगार तरुणांची तुलना झुरळांशी केली. त्यांचे हे वक्तव्य सोशल मीडियावर प्रचंड वायरल झाले. अनेक तरुणांनी त्यांच्या या वक्तव्याबाबत रोष व्यक्त केला होता. त्यांनंतर अभिजित दिपके या तरुणाने कॉक्रोच जनता पार्टी या नावाने इंस्टाग्राम, एक्ससारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर स्वतंत्र अकाउंट सुरु करून एक प्रकारची डिजिटल चळवळ सुरु केली. पुढे कॉक्रोच जनता पार्टीची वेबसाइटदेखील तयार करण्यात आली आणि तिच्या माध्यमातून हजारो-लाखो तरुण या चळवळीत सहभागी होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कॉक्रोच जनता पार्टी ही जेनझीची पार्टी असून, देशात एका नव्या प्रकारच्या जेनझी क्रांतीची सुरुवात होत असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

जेनझीची कॉक्रोच जनता पार्टी थेट नेपाळमध्ये झालेल्या जेनझी आंदोलनाची आठवण करून देते. नेपाळमध्ये सरकारने सोशल मीडियावर बंदी घातल्यामुळे जेनझीने आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. जेनझी ही सोशल मीडियावर व्यक्त होणारी पिढी मानली जाते आणि त्याच माध्यमावर बंदी आणल्याने अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावले जात असल्याची भावना तरुणांमध्ये निर्माण झाली. या आंदोलनाचे कारण फक्त सोशल मीडियावर लागू केलेली बंदी नसून देशातील वाढती बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि सत्ताधाऱ्यांची आलिशान जीवनशैली याविरोधातील रोषही होता. दरम्यान, नेपाळमधील राजकीय नेत्यांची मुले आणि नातेवाईक परदेशात शिक्षण घेत असून, ते ऐशोआरामाचे जीवन जगत असल्याचे अनेक सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाले. एकीकडे देशातील सामान्य तरुण बेरोजगारीशी झुंज देत असताना सत्ताधाऱ्यांच्या कुटुंबांचे आलिशान जीवन पाहून तरुणांचा संताप वाढत गेला. सोशल मीडियावर नेपाळ सरकारविरोधी भावना वाढू लागल्याने सोशल मीडियावर बंदी घालण्यात आली, असा आरोप आंदोलकांनी केला होता. आणि पुढे नेपाळमध्ये जेनझी आंदोलनाला सुरुवात झाली. यानंतर आंदोलन तीव्र झाले आणि नेपाळमध्ये जेनझी क्रांतीची चर्चा सुरू झाली.

देशात भ्रष्टाचारी सरकार नसेल तर भ्रष्टाचार संपेल आणि देशात एक नवीन राजकीय संस्कृती उदयास येईल, असे नेपाळच्या नागरिकांना अपेक्षा होती. यानंतर थेट सत्तांतराचा दिशेने हालचाली सुरू झाल्या. दिवसेंदिवस आंदोलन चिघळत गेले. अनेक मंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. काही देश सोडून पळून गेले. या प्रचंड रोषापुढे झुकत पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांनी ९ सप्टेंबर, २०२५ रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिला. सरकारने सोशल मीडियावरील बंदी मागे घेतली आणि काठमांडूमध्ये लष्कर तैनात करून या तीव्र संघर्षाला पूर्णविराम मिळाला. या आंदोलनानंतर नेपाळी तरुणांनी खऱ्या अर्थाने जेनझी क्रांती घडवून आणल्याचे अनेकदा म्हटले गेले आणि जगभरातून त्यांचे कौतुकही झाले.

नेपाळमधील या आंदोलनाकडे भारतातील तरुणाईचे बारकाईने लक्ष होते. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या आंदोलनाच्या व्हिडिओंवर "हे भारतात कधी घडणार?" किंवा "भारताचा नेपाळ व्हायला वेळ लागणार नाही", अशा प्रतिक्रिया भारतीय तरुण देत होते. यावरून देशातील तरुणाई भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि व्यवस्थेतील त्रुटींमुळे अस्वस्थ असल्याचे स्पष्ट होते आणि भविष्यात भारतातील जेनझीदेखील असे आंदोलन छेडू शकते, अशी चर्चा झाली. आज नेपाळसारखी परिस्थिती भारतात आहे. जेनझी ही सोशल मीडियावर व्यक्त होणारी पिढी आहे. आज भारतातही भ्रष्टाचार, पेपरफुटी, महिलांवरील अत्याचार, पाणीटंचाई, खड्डेमय रस्ते, डळमळीत आरोग्यव्यवस्था, शिक्षणातील समस्या आणि वाढती बेरोजगारी यांसारखे अनेक प्रश्न तरुणांना अस्वस्थ करत आहेत. हीच तरुणाई सोशल मीडियाच्या माध्यमातून सातत्याने आपली भूमिका मांडताना दिसत आहे. आता अभिजीत दिपके याने कॉक्रोच जनता पार्टीची निर्मिती केली आहे. या पार्टीची पाच प्रमुख धोरण आहेत. त्यात, निवृत्तीनंतर न्यायाधीशांसाठी कोणताही पदलाभ नाही, प्रत्येक वैध मताचे संरक्षण करावे, महिलांसाठी ५० टक्के आरक्षण, स्वतंत्र माध्यमे त्यात गोदी-मीडिया नव्हे, आणि पक्षांतर केल्यास संबंधित नेत्यावर २० वर्षांची बंदी यांचा समावेश आहे.

सध्या सोशल मीडियावर लाखों तरुण म्हणजेच जेनझी कॉक्रोच जनता पार्टीशी जोडले जात असल्याचे दिसत आहे. मात्र, ही केवळ इंटरनेटपुरती मर्यादित भावना ठरणार कि पुढे प्रत्यक्षात राजकीय चळवळीत बदलणार हे येत्या काळातच समजेल. काहींच्या मते, ही चळवळ पुढे जाऊन फक्त एक मिम पेज बनून राहील, तर काहींचा मते यातून नव्या पिढीचा असंतोष आणि बदलाची इच्छा दिसत आहे. त्यामुळे नेपाळच्या जेनझीने जशी क्रांती घडवून आणली तसेच भारतातील जेनझी कॉक्रोच जनता पार्टी च्या माध्यमातून देशात एका नव्या प्रकारची जेनझी क्रांती घडवून जाणार आहेत का? अशी चर्चा सुरु आहे.

दरम्यान, कॉक्रोच जनता पार्टीच्या संस्थापकाबद्दलही दररोज नवनवीन माहिती समोर येत असल्याने हा नवा डिजिटल पक्ष नेमका किती विश्वासार्ह आहे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मात्र, एवढे नक्की देशातील जेनझी आता फक्त बघ्याची भूमिका घेत नाही, तर ती स्वतःचा आवाज निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

**लोकसंसद**

### वंदे मातरमला धार्मिक रंग देऊ नका !

पश्चिम बंगालच्या नवनिर्वाचित सरकारने पहिल्या दिवसापासूनच लोकहितकारी निर्णय घेण्याचा धडाका लावला आहे. आता राज्यातील सर्व मदरशांमध्ये प्रार्थना सभेदरम्यान वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत गाणे अनिवार्य करण्यात आले आहे. या निर्णयामुळे राज्यातील विरोधी पक्ष दुखावला असला तरी देशभरातून या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे. जुलमी इंग्रज शासनाच्या जोखडातून भारतमातेला मुक्त करण्यासाठी सहस्रो क्रांतिकारकांनी आपले प्राण समर्पित केले. त्यावेळी वंदे मातरम या बीजमंत्राने क्रांतीकारकांना देशासाठी सर्वस्व पणाला लावण्याची आणि स्वातंत्र्यासाठी पेटून उठण्यासाठी नवसंजीवनी देण्याचे महत्कार्य केले. घरादारावर तुळशीपत्र ठेवून देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात उडी घेणारे जसे हिंदू क्रांतिकारक होते तसे मुसलमानही होते. त्यावेळी कोणीही वंदे मातरम म्हणण्याला विरोध केला नव्हता. वंदे मातरमला धार्मिक रंग देऊन मुसलमानांची माथी भडकवण्याचे काम नंतरच्या राजकारणी मंडळींनी केली जे आजतागायत सुरु आहे. परिणामी वंदे मातरम आम्ही म्हणणार नाही असे म्हणणारा एक वर्ग स्वतंत्र भारतात निर्माण झाला. धर्म एका बाजूला आणि देश एका बाजूला. जेव्हा देशासाठी काही करण्याचा प्रसंग येतो तेव्हा धर्म बाजूला ठेवावाच लागतो. प्रत्येकाला आपापला धर्म प्रिय आहे आणि तो असायलाही हवा, म्हणून मातृभूम ीला वंदन करण्यात कसला आलाय दुजाभाव ? आपण ज्या देशात राहतो, ज्या देशाचे खातो जो देश आपला आणि आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवतो, त्याचे रक्षण करतो त्याला प्रतिदिन नमन करणे हे प्रत्येक भारतीयांचे अलिखित कर्तव्यच आहे. त्यामुळे वंदे मातरम म्हणण्याच्या बाबतीत कोणी धर्माला मध्ये आणू नये !

– **सौ. मोक्षदा घाणेकर**, काळाचौकी, मुंबई

**दिनविशेष**

# जागतिक थायरॉईड दिवस

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे अनेक आजारांशी सामना करावा लागत आहे. त्यामध्ये थायरॉईड हा एक गंभीर पण दुर्लक्षित आजार ठरतो. याबाबत जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २५ मे रोजी 'जागतिक थायरॉईड दिन' साजरा केला जातो. विशेषतः महिलांमध्ये थायरॉईडच्या समस्या अधिक प्रमाणात आढळतात, यामागे हार्मोनल बदल, तणाव आणि अनुवंशिकता ही मुख्य कारणे आहेत.

अंतःस्रावी संस्था ही एक अत्यंत गुंतागुंतीची अवयव प्रणाली आहे, जी काही विशिष्ट हार्मोनल विकारांना बळी पडते, त्यापैकी काही तर पूर्णपणे मानवी नियंत्रणाबाहेर असतात. थायरॉईडच्या समस्या या अत्यंत सामान्य हार्मोनल आरोग्य समस्या आहेत, ज्या जगभरातील मोठ्या लोकसंख्येला प्रभावित करतात. अमेरिकन थायरॉईड असोसिएशनच्या अहवालानुसार, जगभरातील २०० दशलक्षाहून अधिक आणि भारतातील ४२ दशलक्षाहून अधिक लोक हायपरथायरॉईडीझम किंवा हायपोथायरॉईडीझम या दोन प्रकारच्या थायरॉईड विकारांपैकी एकाने ग्रस्त आहेत. या जागरूकतेच्या अभावामुळे अनेकदा या समस्यांकडे दुर्लक्ष होते.

थायरॉईडबद्दलच्या जनजागृतीचा अभाव दूर करण्यासाठी दरवर्षी २५ मे रोजी जागतिक थायरॉईड दिन साजरा केला जातो. या महत्त्वपूर्ण दिवसाचा उद्देश सर्वसामान्य जनतेला थायरॉईडचे आजार, त्याची लक्षणे, प्रतिबंध आणि उपचार यांबद्दल शिक्षित करणे हा आहे. जगभरात थायरॉईडच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. बदललेली लाईफस्टाईल आणि चुकीचा आहार यामुळे थायरॉईडचा त्रास सुरु होतो. पुरुषांपेक्षा स्त्रियांना थायरॉईडचा त्रास होण्याचे प्रमाण जास्त असल्याचे काही सर्वेक्षणांमध्ये आढळले आहे. थायरॉईडचा त्रास असल्याने शरीरातील इतर अवयवांच्या कामावरदेखील परिणाम होतो. थायरॉईडचे हायपोथायरॉइडिजम आणि हायपरथायरॉइडिजम हे दोन प्रकार आहेत. जेव्हा थायरॉईड ग्रंथीमधून जास्त हार्मोन्सची निर्मिती होते. तेव्हा हायपरथायरॉइडिजम होतो. तर जेव्हा थायरॉईड ग्रंथीमधून पुरेशा प्रमाणात हार्मोन्सची निर्मिती होत नाही, तेव्हा हायपोथायरॉइडिजम होतो. हायपोथायरॉइडिजम झाल्यावर वजन वाढणे, थकवा येणे आणि निराश वाटणे अशी लक्षणे जाणवायला लागतात. तर हायपरथायरॉइडिजममुळे वजन कमी होते.

महिलांमध्ये हार्मोनल चढ-उतार सतत सुरू असतो. मासिक पाळी, गर्भधारणा, प्रसूती आणि रजोनिवृत्ती या सर्व अवस्थांमध्ये हार्मोनल संतुलन बिघडू शकते. याचा थेट परिणाम थायरॉईड ग्रंथीच्या कार्यक्षमतेवर होतो. याशिवाय, तणावाची पातळीही महिलांमध्ये अधिक असते. घर, करिअर, कुटुंब अशा सर्व जबाबदाऱ्यांमुळे ताण वाढतो. तणावामुळे कॉर्टिसोल हा संप्रेरक वाढतो, जो थायरॉईड कार्यावर परिणाम करतो. तसेच, कुटुंबात जर थायरॉईडचा इतिहास असेल तर महिलांमध्ये या आजाराचा धोका अधिक असतो. युरोपियन थायरॉईड असोसिएशन या दिवशी पथनाट्य, जनजागृती कार्यक्रम आणि व्याख्यानांचेही आयोजन करत असते. थायरॉईड दिनानिमित्त आयोजित करण्या येणाऱ्या कार्यक्रमांच्या मागचा उद्देश थायरॉईडविषयी जनजागृती निर्माण करणे, हा आहे. विविध आरोग्य संघटनादेखील जागतिक थायरॉईड दिनानिमित्त जनजागृतीसाठी कार्यक्रमांचे आयोजन करत असतात. लोकांना या आजाराविषयी माहिती देऊन त्यांच्या मनातील गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न या दिवशी केला जातो. जरी थायरॉईडच्या समस्या हार्मोनल आरोग्याशी संबंधित असल्या, जे मानवी नियंत्रणाबाहेर आहे, तरीही तुम्ही आरोग्याबाबत जागरूक असाल तर त्यावर मात करणे सोपे आहे. जर तुम्हाला थायरॉईडची लक्षणे असल्याची शंका असेल, तर योग्य निदान आणि उपचारांसाठी तुम्ही ताबडतोब एका प्रमाणित एंडोक्राइनोलॉजिस्टचा सल्ला घ्यावा. याव्यतिरिक्त, थायरॉईडच्या आरोग्यासाठी आयोडीनयुक्त संतुलित आहार घेऊन तुम्ही तुमच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२५ मे**

१)श्री.रमेश महादेव काठे
कामथ, किहीम, अलिबाग
२५-०५-१९४१
२) श्री. रसिकचंद्र बाळकृष्ण गुर्जर
अलिबाग, रायगड
२५-०५-१९४२
३) श्रीम. सुगंधा रामचंद्र रोकडे
चेंढरे, अलिबाग
२५-०५-१९४४
४) श्री. अरविंद शंकर वाघ
रामनाथ रोड, चेंढरे, अलिबाग
२५-५-१९४९
५) श्रीमती पल्लवी हेमंत गुळेकर
रायवाडी कॉम्प्लेक्स, अलिबाग
२५-०५-१९६०
६) श्री. सतिश राजाराम वर्तक
पंतनगर, चेंढरे, अलिबाग
२५-०५-१९५५

# शिक्षकांसाठी आता आभा कार्ड अनिवार्य

## अन्यथा वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके थांबणार!

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील शिक्षकांसाठी राज्य शासन विविध सुविधा काही योजना राबवित देते. वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना ही तशीच एक सुविधा म्हटल्या जाते. म्हणजे शिक्षक किंवा त्याच्या कुटुंबातील कोणी आजारी झाल्यावर त्याच्या उपचाराचा खर्च शासन देत असते. त्यासाठी जी देयके सादर केली जातात त्यास वैद्यकीय प्रतिपूर्ती म्हणतात. आता याचा लाभ मिळण्यासाठी एक अट शासनाने लागू केली आहे. २२ मे रोजी तसा आदेश काढण्यात आला आहे.




राज्यातील १०० टक्के अनुदानित खाजगी शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी ही एक अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने राज्यातील सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना आयुष्यमान भारत हेल्थ अकाऊंट म्हणजेच आभा कार्ड काढणे बंधनकारक केले आहे. यापुढे आभा कार्ड नसलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्याचे ५ लाख रुपयांपर्यंतचे वैद्यकीय प्रतिपूर्तीचे देयक स्वीकारले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा शिक्षण विभागाने दिला आहे.

**असे आहे परिपत्रक**

या संदर्भात शिक्षण उपसंचालक डॉ. एकनाथ आंबोकर यांनी २२ मे २०२६ रोजी परिपत्रक जारी करून राज्यातील सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी, मुंबईचे शिक्षण निरीक्षक आणि वेतन व भविष्य निर्वाह निधी पथकाचे अधीक्षक यांना त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

निर्णय का घेण्यात आला याचे कारण देण्यात आले आहे. राज्यातील सर्व जिल्हा परिषद व खाजगी १०० टक्के अनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांना कॅशलेस वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यापूर्वी मागणी करण्यात आली होती. हा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सादर केला असता, विस्तारितमहात्मा फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत राज्यातील सर्व नागरिकांना प्रति कुटुंब प्रति वर्ष ५ लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य संरक्षण लाभ अनुज्ञेय असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

धार कार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्सचा वापर करून, लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकावर येणारा ओटीपी टाकून नोंदणी पूर्ण करावी. प्रक्रिया पूर्ण झाल्यावर १४ अंकी कार्ड पीडीएफ स्वरूपात डाउनलोड करता येईल. ऑफलाइन पद्धत: इंटरनेटची सोय नसलेल्या कर्मचाऱ्यांनी जवळच्या सरकारी रुग्णालयात किंवा अधिकृत कॉमन सर्व्हिस सेंटरवर जाऊन आधार कार्ड दाखवून हे कार्ड काढून घ्यावे. सर्व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आपापल्या स्तरावरून सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना ही माहिती त्वरित अवगत करून देण्याच्या सूचना शिक्षण संचालनालयाने दिल्या आहेत.

**आभा कार्डचे महत्व**

या योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा आधीपासूनच समावेश आहे. त्यामुळे या योजनेचा संपूर्ण लाभ घेण्यासाठी कर्मचाऱ्यांकडे आभा कार्ड असणे आवश्यक करण्यात आले आहे. ङ्गआभाफकार्ड आणि त्याचे महत्त्व असे आहे. आभा कार्ड हे नागरिकांच्या आरोग्याची सर्व माहिती डिजिटल स्वरूपात सुरक्षित ठेवणारे एक १४ अंकी ओळखपत्र आहे. हे कार्ड पूर्णपणे मोफत काढता येते. भविष्यात आरोग्य सेवांचा कॅशलेस आणि डिजिटल लाभ घेण्यासाठी हे कार्ड अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

**कृषीवलच्या वाचकांना आवाहन**




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## अपघातात तरुण जखमी

**नवीन पनवेल :** वाहन स्लीप झाल्याने झालेल्या अपघातात आयुष रेडेलवार जखमी झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. शिवगंगा रिसॉर्ट जवळ आयुष हा मोटरसायकल घेऊन भरधाव वेगाने जात होता. त्यावेळी रस्त्याच्या स्पीड ब्रेकर वरून त्याची मोटर सायकल स्लिप झाली.

# नगरपंचायततर्फे पालीत मान्सूनपूर्व कामांना वेग

## पावसाळ्यापूर्वी सर्व कामे पूर्ण करणार

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली शहरात नगरपंचायत तर्फे नालेसफाईच्या कामांना सुरुवात झाली आहे. पावसाळ्यापूर्वी नालेसफाई व गटारे आणि नाले सफाईची ही सर्व कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. परिणामी पालीत पावसाळ्यात गटारे व नाले तुंबण्याचा धोका राहणार नाही.

पाली नगरपंचायत कार्यालयात मान्सूनपूर्व कामांची तयारी व नियोजन बैठक नगराध्यक्ष पराग मेहता उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर तसेच सर्व नगरसेवक यांच्या उपस्थितीत पार पडली. त्यानुसार पाली शहरातील सर्व मुख्य नाले व अंतर्गत गटारे यांचे सफाई व दुरुस्ती काम युद्ध पातळीवर चालू आहे. अतिरिक्त मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री वापरून चांगल्या पद्धतीने नालेसफाई करण्यात येत आहे

ठरलेल्या नियोजनाद्वारे येथील वेगवेगळ्या ठिकाणची नालेसफाई टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येईल. बांधकाम साहित्य यामध्ये वाळू व रेती, पाणी बॉटल, प्लॅस्टिकच्या पिशव्या, घरगुती कचरा व गाळ यामुळे येथील बहुसंख्य ठिकठिकाणी नाले व गटारे तुंबली आहेत. ते सर्व काढून नालेसफाई होत आहे. नगरपंचायत चे सफाई कर्मचारी नियमित नालेसफाई करतात. पावसाळ्यापूर्वी होत असलेली नालेसफाई ही अत्याधुनिक यंत्र व जेसीबीच्या सहायाने



अधिकची माणसे घेऊन करण्यात येत आहे. याबरोबरच गटारे व नाल्याभोवती उगवलेले गवत, झाडेझुडपेदेखील काढली जात आहेत. त्यामुळे या तुंबलेली गटारे व नाले पूर्णपणे साफ केली जात आहेत. तसेच नालेसफाई सुरुवात झाल्याने दुर्गंधी व घाण सर्व समस्या काही दिवसात मार्गी लागणार आहेत.

> **पाली नगरपंचायत तर्फे मान्सूनपूर्व कामांचे योग्य नियोजन केले असून मान्सूनपूर्व कामांना वेग आला आहे. अतिरिक्त मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री वापरून सर्व प्रभागातील कामे सुरू आहेत. पावसाळ्यापूर्वी सर्व कामे पूर्ण केली जातील. नागरिकांना आवाहन आहे की त्यांनी गटारे व नाल्यामध्ये घरातील कचरा, प्लास्टिक कचरा किंवा बांधकाम साहित्य टाकू नये.**
> **-सुलतान बेनसेकर, उपनगराध्यक्ष, पाली**

## पनवेल एसटी स्टँडवर मनसेचा दणका

**पनवेल :** मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांसाठी पनवेल एसटी बस स्थानक हे एक महत्त्वाचे केंद्र आहे. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून या स्थानकावरील शौचालयाच्या व्यवस्थापनाबाबत प्रवाशांकडून, विशेषतः महिला प्रवाशांकडून अनेक गंभीर तक्रारी प्राप्त होत होत्या. तक्रारींचा ओघ वाढताच मनसेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी थेट पनवेल स्टँडवर धडक दिली. प्रवाशांकडून रीतसर पैसे घेतले जात असताना रात्रीच्या वेळी शौचालय बंद का ठेवले जाते, असा जाज्वल्य प्रश्न कार्यकर्त्यांनी उपस्थित केला. मनसे कार्यकर्त्यांनी तेथील कर्मचाऱ्यांना व कंत्राटदाराला मनसे स्टाईलने कडक शब्दांत समज दिली.

# कलेच्या गावाला मानाचा मुजरा

## पानिपतकार विश्वास पाटील यांचे उद्गार

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

शिवछत्रपतींच्या रायगड जिल्ह्यात इतिहास घडत असताना, या जिल्ह्यातील गोवठणे गावात ऐतिहासिक नाटकाची परंपरा उभी केली जात असताना, या गावाच्या रंगभूमीने शेकडो वर्षाच्या नाट्यकलेची समृद्ध परंपरा जोपासत, ग्रामीण रंगभूमीच्या नाट्य परंपरेचा प्रेरणादायी वारसा जोपासत, या रंगभूमीने अनेक दर्जेदार आणि रसिकमान्य नाटके दिली. त्यामध्ये माझ्या लेखणीतून उतरलेली रणांगण हि नाट्य कलाकृती या छोट्याशा गावामध्ये मोठ्या उत्साहाने उमलत आहे. त्यामुळे या बहाद्दर कलाप्रेमी गावाला मी मानाचा मुजरा करतो. असे भावनिक उद्गार पानिपतकार विश्वास पाटील यांनी काढले.



गोवठणे येथील रंगभूमीत जय हनुमान नाट्य मंडळाच्या वतीने शनिवारी (दि. २३) रात्री दहा वाजता रणांगण या दोन अंकी नाट्यप्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी पानिपतकार विश्वास पाटील हे आपल्या उद्घाटनपर भाषणात बोलत होते. या प्रसंगी रायगड भूषण एल. बी. पाटील, कांतीलाल कडू, साहित्यिक डॉ. राठोड, साहित्यिक सुधाकर पाटील, नाट्य दिग्दर्शक पांडुरंग पाटील, पत्रकार अजित पाटील, राणी म्हात्रे, सुरज म्हात्रे, रुपेश पाटील, चंद्रशेखर ठाकूर, समाधान म्हात्रे, हसूराम पाटील, धनेश्वर म्हात्रे, अशोक म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यापुढे विश्वास पाटील यांनी दिग्दर्शक नटवर्य पांडुरंग पाटील यांनी आपले कसब वापरत, अभिनयाच्या जोरावर रणांगण सारख्या नाटकाचे शिवधनुष्य लिलया पेलले आहे. त्यांच्यासह येथील सर्व कलाकारांनी ग्रामीण रंगभूमीसाठी दिलेले योगदान मोठे आहे. अनेक ग्रामीण कलाकारांनी अभिनयाच्या जोरावर ग्रामीण रंगभूमी समृद्ध केली आहे. असे सांगून पानिपतचा प्रसंग मोठा होता. दिल्लीच्या रक्षणासाठी शिंदे, होळकर व पेशवे हे पानिपतावर लढले. एक लाख बांगडी या पानिपतच्या मैदानावर चुरडली गेली. अशा या प्रचंड लढाईची कहाणी या नाटकातून साकारली गेली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# अनधिकृत कनेक्शन बंद केल्यामुळे माथेरानला मुबलक पाणी मिळणार

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

उल्हास नदीतून केवळ माथेरानसाठी होणाऱ्या वाढीव पाणी पुरवठ्यामधून घाटरस्त्यात अनेकांनी अनधिकृतपणे पाणी चोरी करून विविध ठिकाणी कनेक्शन घेतलेले आहेत त्यामुळेच माथेरानच्या पाणी योजनेतील पाण्याच्या चोरीमुळे माथेरानला कमी दाबाने पाणी पुरवठा होत असतो. ही बाब निदर्शनास आल्यावर स्वतः विद्यमान नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी घाटातील काही ठिकाणी हे अनधिकृत कनेक्शन बंद केल्यामुळे आगामी काळात माथेरानला मुबलक पाणी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नेरळ पासून ते जुंमा पट्टी पर्यंतच्या भागात काही राजकीय पक्षांच्या मंडळींनी सुध्दा अनधिकृतपणे पाणी चोरी करत असल्याचे बोलले जात आहे.एकीकडे माथेरानकर भरमसाठ पाणी बिले भरत असतात आणि दुसरीकडे परिसरातील काही राजकीय पक्षांच्या मंडळींसह अन्य लोक या पाण्यावर डल्ला मारताना दिसत आहेत. ह्या पाण्याच्या चोऱ्या अनेक वर्षांपासून केल्या जात असल्याचेही बोलले जात आहे. पावसाळ्यात चार महिने नेरळच्या उल्हास नदीतून पाण्याचा उपसा केला जात नाही. तरीसुद्धा राज्यात कुठे नव्हे एवढया मोठ्या प्रमाणावर पाणी बिले नाईलाजाने नागरिकांना भरावी लागत आहेत. पाण्याची समस्या फक्त माथेरानच्या स्थानिकांना जाणवत असून इथल्या हॉटेल धारकांना भरपूर प्रमाणात पाणी उपलब्ध होत असल्याने त्यांच्या याबाबत केव्हाच तक्रारी नसतात. संबंधित अधिकारी वर्गाने याकडे गांभीर्याने लक्ष केंद्रित करून यापुढे पाणी चोरीला आळा घालण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी जोर धरू लागली आहे.

> **जवळपास सोळा ठिकाणी पाण्याच्या अनधिकृत जोडण्या केल्या असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. लवकरच ही अनधिकृत कनेक्शन आम्ही स्वतः हजर राहून कट करणार आहोत.याबाबत संबंधित अधिकारी वर्गाला सूचना केल्या आहेत. या पाणी चोरीमुळेच माथेरानला पाणी कमी प्रमाणात उपलब्ध होत असते.**
> **- चंद्रकांत चौधरी, नगराध्यक्ष माथेरान**

## वडमाळवाडी येथे खाऊ वाटप

**हमरापूर :** वडमाळवाडी येथे मनसे युवा सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. मनसे रायगड जिल्हा अध्यक्ष बाळा म्हात्रे, महिला अध्यक्ष छाया शिंदे, कामगार सेनेचे सरचिटणीस पंकज शहा, दिलीप पाटील, देवेंद्र म्हात्रे, यांच्यासह कार्यकर्ते व विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहांमध्ये मोफत प्रवेश

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सामाजिक न्याय विभागांतर्गत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, रायगड यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या जिल्ह्यातील सात शासकीय वसतिगृहांमध्ये शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. गरीब, हुशार, होतकरू तसेच मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार हे प्रवेश दिले जाणार आहेत. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त गरजू विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुनील जाधव यांनी केले आहे.

मुलांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह महाड, तळा आणि अलिबाग. मुलींसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाईफुलेशासकीयवसतिगृह महाड, पनवेल, अलिबाग आणि पाली-सुधागड येथे प्रवेश दिला जाणार आहे.

शासन निर्णयानुसार प्रवेशासाठी अनुसूचित जाती ८५%, विमुक्त जाती व भटक्या जमाती ५%, आर्थिकदृष्ट्या मागास घटक ५%, अनुसूचित जमाती ३%, विशेष मागास प्रवर्ग २% असे आरक्षण आणि प्रवर्गनिहाय टक्केवारी आहे.

वसतिगृहात प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ मोफत निवास आणि भोजनच नाही, तर आर्थिक सहाय्यही दिले जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.


**नवीन द्रुतगर्ती मार्ग उभारण्याच्या हालचाली | चौक येथून सुरू होणार महामार्ग**

# मुंबई ते पुणे प्रवास केवळ ९० मिनिटांत

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अलीकडच्या काळात मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अनेक गंभीर अपघात आणि वाहतूक कोंडीच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे या मार्गाला समांतर असा नवीन द्रुतगर्ती मार्ग उभारण्याच्या हालचाली शासकीय पातळीवर सुरू झाल्या आहेत. या नवीन मार्गाचा प्रकल्प विकास आराखडा आणि व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने निविदा मागविल्या आहेत. या नवीन मार्गामुळे मुंबई ते पुणे हे अंतर केवळ ९० मिनिटांत पार करता येणार आहे.

नवीन पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग १३० किलोमीटर लांबीचा असणार आहे. हा महामार्ग रायगड जिल्ह्यातील चौक येथून सुरू होणार आहे. जेएनपीटी बंदर ते चौक या महामार्गाशी हा मार्ग जोडला जाईल. हा नवीन मार्ग चौकपासून थेट पुणे बाह्यवळण मार्गावर भोरमधील शिवरे गावाशी जोडला जाणार आहे. या नव्या मार्गामुळे पुणे हे



अटल सेतूशी जोडले जाणार आहे. सध्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाढती वाहतूक, अपघात आणि सततची कोंडी ही मोठी समस्या बनली आहे. नव्या मार्गामुळे सध्याच्या द्रुतगती मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च १५ हजार कोटी रुपये असणार आहे. नवीन मुंबई-पुणे द्रुतगती प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल आणि व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने निविदा मागवल्या आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकल्प हा मार्ग आठपदरी असेल. हा मार्ग प्रवेश नियंत्रित महामार्ग म्हणून विकसित होईल. यामुळे पुणे, मुंबई, नवी मुंबई, जेएनपीटी बंदर आणि औद्योगिक कॉरिडॉर यांच्यातील मालवाहतूक अधिक वेगवान होईल. विद्यमान मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे सध्या प्रवासाचा कालावधी सुमारे अर्ध्या तासाने कमी झाला आहे. भविष्यात या मार्गावरील वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेता नवीन मार्ग फायद्याचा ठरेल. या मार्गावर दररोज तीन लाख वाहने धावू शकतील.

> **नवीन मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यात येणार आहे. त्यानंतर अंतिम मार्गरेषा, खर्च, भूसंपादन आणि बांधकामाचा आराखडा निश्चित केला जाणार आहे. सध्याच्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला समांतर असा हा मार्ग असेल. तो नवीन मुंबई-बंगळुरू महामार्गाचा भाग असेल. यामुळे भविष्यात मुंबई ते बंगळुरू हे अंतर सहा तासांपेक्षा कमी वेळेत पार करता येईल, अशी माहिती भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम यांनी दिली.**

# निवडक

## मुरूड मच्छीमार्केटमध्ये वाहतूक कोंडी

**आगरदांडा :** मुरूड जंजिरा नगरपरिषदेच्या वतीने लाखो रुपये संपवून कोळी बांधवाकरिता मच्छी मार्केट बांधले आहे.परंतु काही कोळी महिला विक्रेते मोटारसायकल लावण्याच्या पार्किंग जागेवर मच्छी विक्री करत असतात. त्यामुळे मच्छी खरेदी करणारे मोटार सायकल वाहन चालक बिनधास्तपणे आपली गाडी रस्त्यालगत गाडी उभी करुन मच्छी खरेदी करण्यासाठी मच्छी मार्केटमध्ये जातात. त्यामुळे या रस्तावर सतत वाहतूक कोंडी होताना दिसत आहे. ही वाहतूक कोंडी कधी सुटणार असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे. मुरूड पर्यटन क्षेत्र असल्याने याच रस्त्यावरून पर्यटक ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी जा-ये करत असतात.त्या बरोबर स्थानिक नागरिक ही या रस्त्यावरून आपले वाहन घेऊन ये-जा करित असतात.त्यामुळे या ठिकाणी वाहतूक कोंडी होत असते. आज रविवारी असल्याने पर्यटकांसह स्थानिक नागरिकांनी मच्छी खरेदीसाठी गर्दी केल्याने या रस्त्यावर वाहतूक कोंडी अधिक वाढल्याने वाहनचालकांसह पादचारी अक्षरश: वैतागले आहेत. ही वाहतूक कोंडी सुटण्याकरिता स्थानिक प्रतिनिधी पुढे येऊन याठिकाणी वन वे करावे जेणेकरून वाहतूक कोंडीला आळा बसेल, अशी मागणी पर्यटकांसह स्थानिक नागरिक करीत आहेत.



## नगराध्यक्षांची प्राधिकरणाशी चर्चा

**माथेरान :** ऐन सुट्ट्यांच्या हंगामात पाण्याची गहन समस्या निर्माण झाल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून याचा पर्यटनावर विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे यासाठी मागील काही दिवसांपूर्वी स्वतः नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी विविध पंपिंग हाऊस वर भेटी देऊन पाहणी करून तातडीने पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले होते. तरीसुद्धा काहिनाकाही तांत्रिक बाबी येत असल्याने माथेरानला पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. अखेरीस माथेरानमध्ये सध्या सुरू असलेल्या पाणी प्रश्नावरती नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी पनवेलचे जल प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता एस.पी.वेंगुर्लेकर यांच्याबरोबर आज चर्चा करून दोनच दिवसात माथेरान करिता नवीन पंप येथे बसविण्याचे मान्य केले आहे. माथेरानमधील पाणी प्रश्नासाठी नगराध्यक्ष यांनी केलेली बोलणी यशस्वी झाल्यास माथेरानकरांचा या हंगामातील पाणी प्रश्न सुटणार आहे व इतर पंप व तेथील मेंटेनन्सबाबत चर्चा झाली असून ही कामे सुध्दा लवकरच पूर्ण केली जातील असे आश्वासन त्यांना दिले गेले आहे.

## हरवलेले मोबाईल नागरिकांना परत

**खोपोली :** कधी गर्दीत, कधी प्रवासात, तर कधी नकळत हरवलेला मोबाईल परत मिळेल अशी आशाच अनेकजण सोडून देतात. मात्र खोपोली पोलिसांनी आपल्या तत्परतेने आणि तांत्रिक कौशल्याच्या जोरावर अशा ४० नागरिकांच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद फुलवला आहे.खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध नागरिकांनी गहाळ झालेल्या मोबाईल फोनबाबत तक्रारी नोंदवल्या होत्या. या तक्रारींचा गांभीर्याने तपास करत पोलिसांनी सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर या आधुनिक प्रणालीचा प्रभावी वापर केला. त्यातून तब्बल ८ लाख २४ हजार रुपये किंमतीचे ४० मोबाईल फोन शोधण्यात पोलिसांना यश आले.विशेष म्हणजे हे मोबाईल केवळ रायगड जिल्ह्यातच नव्हे, तर महाराष्ट्रातील विविध भागांसह इतर राज्यांमध्ये वापरात असल्याचे निष्पन्न झाले. तांत्रिक तपास, माहिती संकलन आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे मोबाईल शोधून काढण्यात आले. २३ मे रोजी खोपोली पोलीस ठाण्यात आयोजित कार्यक्रमात हे मोबाईल त्यांच्या मूळ मालकांकडे सुपूर्द करण्यात आले. हरवलेली मौल्यवान वस्तू पुन्हा मिळाल्याने अनेक नागरिकांनी आनंद व्यक्त करत पोलिसांचे आभार मानले.विशेष बाब म्हणजे, यापूर्वीही खोपोली पोलिसांनी १२२ गहाळ मोबाईल हस्तगत केले असून, आतापर्यंत एकूण १६२ मोबाईल फोन, सुमारे ४० लाख ३१ हजार ३०० रुपयांच्या किमतीचे, शोधून मूळ मालकांकडे सुपूर्द केले आहेत.ही उल्लेखनीय कामगिरी रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली, खोपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या नेतृत्वात पोलीस कॉन्स्टेबल अमोल राठोड, रामा मासाळ, निलेश कांबळे, वाल्मीक वाडगे, शुभम जाधव, किरण देवकाते, आकाश डोंगरे, समीर पवार आणि प्रशांत दबडे यांनी अथक परिश्रम व तांत्रिक कौशल्याच्या जोरावर यशस्वीपणे पार पाडली.

## 'अखिल आगरी अधिवेशनात भरवण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा'




**नेरळ :**रायगड,पालघर आणि ठाणे जिल्ह्यातील तरुणांनी अखिल आगरी अधिवेशन भरवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी केले. कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या एसी हॉलचे उदघाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या उद्घाटन प्रसंगी कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या नवीन जमीन खरेदीसाठी २५ लाखाची देणगी देण्याचे महेंद्र घरत यांनी जाहीर केले. दरम्यान कुळगाव बदलापूरच्या नगराध्यक्ष रुचिता घोरपडे यांनी आपल्या गावाच्या आधी कर्जत तालुक्याने आपला सत्कार केल्याबद्दल आभार मानले. कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या नेरळ येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृहचे इमारती मधील पहिल्या मजल्यावर असलेल्या स्व प्रवीण पाटील सभागृहाचे एसी हॉल मध्ये रूपांतर करण्यात आले.या हॉलचे नूतनीकरण उरण येथील यमुना सामाजिक संस्था आणि आतंरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांच्या माध्यमातून यमुनाबाई तुकाराम घरत यांच्या समरणार्थ १२ लाख ५० हजार खर्च करून करण्यात आले.या नूतनीकरण करण्यात आलेल्या एसी सभागृहाचे उद्घाटन महेंद्र घरत यांचे हस्ते कोनशिला अनावरण करून आणि फीत कापून करण्यात आले.यावेळी नवीन हॉल समोरील गणेशाचे मूर्तीचे पूजन कुळगाव बदलापूरच्या नगराध्यक्षा रुचिता घोरपडे यांचे हस्ते झाले. संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला बदलापूर येथील मयूर पिसेकर, नगरसेवक विपुल पाटील, सावळाराम जाधव, एकनाथ धुळे, नागो गवळी, बाबू घारे, भगवान चंचे, महेश विरले, महेश खारीक, नितीन धुळे आणि रेशमा जोशी यांच्यासह रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदसय विनोद भोईर, वैभव पाटील, किरीट पाटील, संजय गवळी, मंगेश म्हसकर, बाजीराव दळवी, ॲड रंजना धुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## निवडक

### शिवशाहीर वैभव घरत यांना पितृशोक

**पेण :** पेण तालुक्यातील खारोशी येथील शिवशाहीर तथा रायगड भूषण वैभव घरत यांचे वडील धनाजी महादेव घरत यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. धनाजी घरत हे स्वभावाने करारी, संयमी व शिस्तप्रिय व्यक्तिमत्त्व म्हणून पंचक्रोशीत परिचित होते. आपल्या शिस्तबद्ध आणि कर्तव्यनिष्ठ स्वभावामुळे त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली होती. शेतकरी कामगार पक्षाचे खंदे समर्थक म्हणूनही त्यांची ओळख होती. शिक्षणाला प्राधान्य देत त्यांनी आपल्या तिन्ही मुलांना उच्चशिक्षित केले. मोठी कन्या वैशाली या एम.ए., बी.एड. शिक्षण पूर्ण करून सध्या शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. शिवशाहीर वैभव घरत यांनी कृषी शाखेची पदवी घेतली असून ते सध्या ग्रामसेवक म्हणून कार्यरत आहेत. तर धाकटे चिरंजीव वैष्णव यांनी पीएचडी पूर्ण करून एका नामांकित कंपनीमध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत. धनाजी घरत यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, दोन मुले, सुना आणि नातवंड असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर खारोशी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय तसेच कला क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.





### शाळांनी मुलांना नेले जादुई दुनियेत

**अलिबाग :** येथील लायन्स क्लब ऑफ अलिबाग आणि नामांकीत कीडझी व ब्लूमिंग बड्स प्री प्रायमरी स्कूलच्या सहकार्याने वरसोली विद्यानगर येथे भव्य सभागृहात जादूचे प्रयोग आयोजित करण्यात आले. सुप्रसिद्ध जादुगार सलोनी यांनी यावेळी छोटे मोठे पन्नासहून अधिक जादूचे प्रयोग करून लहान मुलांचे मनोरंजन केले. जादू म्हणजे हातचलाखी असून त्या पाठीमागील विज्ञान अतिशय सोप्या शब्दात सांगितले. कीडझी आणि ब्लुमिंग बड्स या येथील सुप्रसिध्द शाळेच्या संचालक अध्यक्ष सीमा शेडगे आणि नितीन शेडगे यांनी आयोजिलेल्या समर कॅम्पमध्ये आर्ट, क्राफ्ट, डान्स, सेल्फ डिफेन्स, चॉकलेट मेकिंग, रेझिन आर्ट, सोप मेकिंग, पर्स मेकिंग या आणि अशा अनेक ॲक्टिव्हिटिज सुरु आहेत. या कॅम्पमध्ये सहभागी झालेली मुले, परिसरातील व इतर शाळेतील मुले यामध्ये सहभागी होऊन आनंद लुटल्याचे चित्र बघायला मिळाले. यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये लायन अध्यक्ष प्रदीप नाईक, सचिव महेश कवळे, खजिनदार अमोघ किंजवडेकर, संतोष पाटील, मेहुल पाटील, कल्पेश थळे संजय माळी, प्री प्रायम री स्कूलचे व इतर विद्यार्थी, त्यांचे पालक, 'कीडझी', ब्लुमिंग बड्स शाळांचे शिक्षक अशी दोनशेहून अधिक उपस्थिती होती.



### आपटा फाटा पुलाच्या रेलिंगचे नुकसान

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील रिटघर मार्गे आपटा फाटा येथील पुलांच्या रेलिंगचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पुलाचे रेलिंग तुटलेल्या अवस्थेत असल्यामुळे वाहनचालक तसेच पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी आणि पावसाळ्यात येथे अपघात होण्याची शक्यता अधिक वाढली आहे. या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असून नागरिकांनी पुलाच्या दुरुस्तीची मागणी केली आहे. स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी केल्या असूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाने तातडीने पुलाचे रेलिंग दुरुस्त करून सुरक्षितता उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

### सराईत त्रिकुटाला पोलिसांनी घेतले ताब्यात

पनवेल : पनवेल परिसरातील अनेक महिलांच्या पर्स पळविणाऱ्या सराईत सराईत त्रिकुटाला अथक प्रयत्न करून तळोजा पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून आतापर्यंत चोरीचा १ लाख ५५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तळोजा पोलीस ठाणे हद्दीत फिर्यादी शशिकला सुनीलकंठ मिश्रा, वय ४९ वर्ष, राह. फेस २, तळोजा या मॉर्निंग वॉक करत असताना मोटरसायकल वरील तीन अनोळखी इसमानी फिर्यादीची पर्स खेचून त्यातील मोबाईल व इतर मुद्देमाल जबरी चोरी करून घेऊन गेले होते. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली निलेश येवले, अमर भोईर, विनोद डुंबरेपाटील, हरिदास करडे, संभाजी कोळेकर, सागर पाटील, विकास ठाकूर, दिपीका चव्हाण आदींच्या पथकाने तळोजा, खारघर, कामोठे, सानपाडा, वाशी, मानखुर्द, चेंबूर, गोवंडी, टिळक नगर या ठिकाणचे एकूण १२० सीसीटीव्ही फुटेज तपासून गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करून तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या मदतीने विधी संघर्ष बालकास ताब्यात घेऊन सदरचा गुन्हा उघडकीस आणला. त्यांना ताब्यात घेतले असता त्यांच्यावर तळोजा, कामोठे, खारघर पोलीस ठाणे येथे अशा प्रकारचे गुन्हे दाखल झाले असल्याचे निष्पन्न झाले आहे. या गुन्ह्यातील विधी संघर्षित बालकास बालसुधारगृहात ठेवण्यात आले आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी** आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात.संपर्क: ९९२३७५०५४९ वेळ: सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत
- jai santoshi maa CNG Alibag wadgav 1) Filler-man 2) Housekeeping Contact No. Shubham Naik - 7774039128, Rohit Pongade - 7498131812
- **दिशा पॅथॉलॉजी लॅब अलिबाग व चोंढी** येथे कामासाठी मुले/मुली पाहिजे (अनुभवी/फ्रेशर उमेदवार चालतील) संपर्क : ८९९९१६१५१९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# मच्छिमार बांधवांवर आर्थिक संकट

## आंध्रप्रदेश सरकारप्रमाणे पॅटर्न राबवून दिलासा देण्याची संघटनेची मागणी

**| उरण | प्रतिनिधी |**

मच्छिमार कुटूंबियांना माहे जून व माहे जुलै दोन महिन्यांचा उदरनिर्वाह भत्ता देण्यात यावे अशी मागणी कोकण किनारा मच्छिमार संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना व संबंधित विभागाना करण्यात आली आहे.



सरकारी आदेशानुसार कोकण किनारपटटीवरील मच्छिमारी १ जुन ते ३१ जुलै कालावधीकरीता बंद करण्यात येणार आहे. तशा प्रकारचा आदेश सहा. मत्स्यव्यवसाय विभागाने जाहीर केलेला आहे. या दोन महिन्यांत माश्यांचा प्रजनन काळ असल्यामुळे तसेच जोरदार पाऊस व वादळाचा धोका यामुळे मच्छिमारी बंद ठेवणे योग्यच आहे. परंतु कोकण किनारपटट्टी वरील मच्छिमारांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह संपूर्ण मच्छिमारीवर चालतो. पुढील २ महिन्यांमध्ये त्यांना कुठलेही उत्पन्न नसल्यामुळे त्यांच्या कुटूंबियांचा उपजिविकेचा प्रश्न निर्माण होत असतो व आताही झालेला आहे. त्यांना या २ महिन्यांकरीता उदरनिर्वाह भत्ता अथवा आर्थिक मदत मिळणे गरजेचे आहे.

नुकताच आंध्र प्रदेश सरकारने त्या राज्यातील मच्छिमारांच्या कुटूंबियांना दोन महिन्यासाठी प्रतिमहिना २०,००० रूपये देण्याचे मान्य केले आहे व त्याचे वाटप सुध्दा चालु आहे. महाराष्ट्र राज्य हे मच्छिमारी व्यवसायातुन मोठ्या प्रमाणात महसुल गोळा करते. तरी या सारख्या आर्थिक सधन राष्ट्राने गरजू मच्छिमारांसाठी आर्थिक मदत देणे क्रमप्राप्त आहे.असे संघटनेचे म्हणणे आहे.त्यामुळे मच्छिमारांच्या प्रत्येक कुटूंबाला प्रतिमहिना रूपये २५,००० प्रमाणे दोन महिन्याचे ५०,००० रूपये आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी कोकण किनारा मच्छिमार संघटनेच्या वतीने प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

> **"कोकण किनारा मच्छिमार संघटनेच्या वतीने आम्ही मागणी करीत आहोत की महाराष्ट्रातील मच्छिमारांना ५0, 000 रूपये उदरनिर्वाह भत्ता द्या.१ जून ते ३१ जुलै या दोन महिन्यामध्ये माशांचा प्रजनन काळ व जोरदार पाऊस या कारणास्तव मच्छिमारी बंद करण्याचे आदेश मच्छिमार आयुक्ताने काढला आहे त्यामुळे मच्छिमारांचा उदरनिर्वाहचा प्रश्न निर्माण झाला आहे. नुकतेच आंध्रप्रदेश सरकारने त्यांच्या राज्यातील मच्छिमारांना उदरनिर्वाह ४0, 000 रूपये भत्ता दिला आहे, त्याप्रमाणे महाराष्ट्र सरकारने सुद्धा द्यावा, हि मागणी करीत आहोत."**
>
> **– कॉम्रेड भूषण पाटील,कामगार नेते तथा मार्गदर्शक कोकण किनारा मच्छिमार संघटना.**

या संदर्भात कामगार नेते तथा संघटनेचे मार्गदर्शक सल्लागार कॉम्रेड भूषण पाटील व त्यांच्या शिष्टमंडळाने उरणचे तहसीलदार उद्धव कदम यांची भेट घेऊन या संदर्भात त्यांना निवेदन दिले व मागण्या पूर्ण करण्याची मागणी केली.यावेळी तहसीलदार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

## गुजराती समाजाच्या पुढाकारातून सोमवारी गंगादशहरा

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील पोलादपूर या ऐतिहासिक व पौराणिक शहरातील अधिक ज्येष्ठ महिना आरंभापासून गंगेचे पृथ्वीवर आगमन झाल्याची तिथी ज्येष्ठ शुध्द गंगादशमी पर्यंत गंगापूजन सोहळा सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास सुरू राहणार आहे. पोलादपूर शहरातील असंख्य भाविक रोज सायंकाळी गंगापूजनासाठी गर्दी करीत आहेत.



२००५ च्या महापूरात नंदी घाटाजवळच्या हत्ती डोहात वाहून गेला. दशानेमा गुजराती समाजाच्या पुढाकारातून येथे गंगामाता मंदिर व सभागृह उभारण्यात आले आहे. जवळच भाविकांनी सिध्देश्वर शंकर मंदिर बांधले आहे.


पोलादपूरच्या एका डोंगरावर श्री काळभैरवनाथ मंदिर आहे अशी काशिक्षेत्रासारखी पौराणिक योजना निर्माण झाली.

पोलादपूर शहरातील भाविक या श्रीदेवी गंगामाता मंदिरासमोरील घाटावर रोज संध्याकाळी गंगापूजन करीत सोमवारी गंगादशमी म्हणजेच गंगेचे पृथ्वीवर आगमन झाल्याची तिथी असल्याने गंगापूजन समारोप करण्यात येणार आहे. यावेळी प्रशांत प्र.शेठ, डॉ. घनश्याम शेठ, जयंत वि.शेठ, मदन शहा, डॉ.नितीन मपारा, संदेश शेठ, सचिन मेहता, सुधीर चित्रे, शैलेश पालकर, नयना शेठ, प्रिती बुटाला, प्रेमा टोलमारे, जयश्री जाधव, तनुजा भागवत, जोशीकाकू, तसेच अन्य भाविकांनी यावेळी उत्तरवाहिनी सावित्रीनदी पात्राकडे पूर्वेला तोंड करून गंगाआरती केली. अखेरच्या दिवसापर्यंत भाविकांनी गंगापूजनाचा लाभ घेण्याचे आवाहन दशानेमा गुजराती समाजातर्फे करण्यात आले आहे.

## टी.डी. पाटील यांचे निधन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

शैक्षणिक क्षेत्रात टी.डी. पाटील सर म्हणून ओळखले जाणारे आदर्श शिक्षक, आंबेपूर-पेझारीचे रहिवासी आणि मूळचे शहाबाजचे निवासी असलेले शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते तुकाराम दिनकर पाटील यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी शनिवार, २३ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात संतोष, निनाद, संदेश, पराग ही चार मुले, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. रविवार, २४ मे रोजी पेझारी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यविधी करण्यात आला.



आपल्या मनमिळाऊ स्वभावामुळे आणि सुविद्य व्यक्तिमत्त्वामुळे पाटील सर संपूर्ण परिसरात आणि शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत परिचयाचे व आदरास पात्र होते. त्यांच्या निधनाने आंबेपूर, पेझारी, शहाबाज आणि पोयनाड परिसरातील एका मार्गदर्शकाला आणि आदर्श शिक्षकाला समाज मुकला आहे. त्यांच्या अंत्यविधीला परिसरातील नागरिक, माजी विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## मुठवली येथील विनीत कापसे याची इस्त्रो भेटीसाठी निवड

**| कोलाड | प्रतिनिधी |**

ग. द. तटकरे विद्यालय, कोलाड येथील विद्यार्थी विनीत कापसे याची भारतीय अंतराळ संशोधन संस्था भेटीसाठी निवड झाली आहे. त्याच्या या यशामुळे विद्यालयासह संपूर्ण कोलाड परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



तालुक्यातील कापसे मुठवली येथील विनीत विशाल कापसे हा विद्यार्थी इयत्ता ९ वी मध्ये शिकत असून, त्याला विज्ञान क्षेत्रामधे खूप आवड आहे. यावर्षीच्या कोलाड विभागात विज्ञान प्रदर्शनात तसेच रोहा तालुका प्रदर्शनात त्याने प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्याच्या या आवडीमुळेच त्याने गुरुकुल एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर आयोजीत राज्यस्तरीय स्पर्धेत घवघवीत यश संपादित करून इस्त्रो भेटीसाठी निवड झाली आहे.

रायगड जिल्ह्या मधून एकूण चार मुलांची निवड झाली असून इस्त्रोमध्ये एक आठवड्याचा मुक्काम असणार आहे. तिथे त्यांना अंतराळ आणि विज्ञान क्षेत्रातील नवनवीन गोष्टी अनुभवायला आणि शिकायला मिळणार आहेत.

## देशी दारुसाठा केला हस्तगत

**पनवेल :** विना परवाना देशी दारुच्या बाटल्या जवळ बाळगल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी एका इसमास ताब्यात घेवून त्याच्याकडून हा साठा हस्तगत केला आहे. पारगाव येथील एका किराणा दुकानात एक व्यक्ती देशी दारुच्या बाटल्या ताबेकब्जात बाळगून त्याची विक्री करत असल्याची माहिती वपोनि नितीन ठाकरे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि हजरतअली पठाण, पो.शि.साईनाथ मोकळ, काकडे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून जवळपास ९ हजार ५२० रुपये किंमतीच्या देशी दारु संत्रा बाटल्या हस्तगत केल्या आहेत.

## लोकप्रतिनिधींनी केले वृक्षारोपण

**| माथेरान | प्रतिनिधी |**

ज्या हिरव्यागार वनराईमुळे माथेरानला खऱ्या अर्थाने ओळख निर्माण झाली आहे तीच वनराई हळूहळू कालबाह्य होत आहे की काय अशी भीती निर्माण झाली असून पर्यावरण अबाधित राहिले तरच इथले पर्यटन कायमस्वरूपी टिकू शकते. पर्यटन वाढीसाठी आजपर्यंत याठिकाणी जरी काही महत्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागू शकले नाहीत तरीसुद्धा जी काही जुनी वनराई स्थानिकांच्या देखरेखीखाली शाबूत आहे त्यामुळेच सद्यस्थितीत जो काही हवेत गारवा आहे त्याचाच अनुभव घेण्यासाठी पर्यटक माथेरानला भेट देतात. इथे पूर्वीप्रमाणे गर्द झाडी नसेल तर चिटपाखरू देखील फिरकणार नाही.



माथेरान पर्यटनस्थळाने १७६ व्या वर्षात पदार्पण केल्यामुळे या रमणीय स्थळाचा वाढदिवस मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा करण्यात आला होता.

गर्द वनराई अशी ओळख असणाऱ्या माथेरानला झाडांची पडझड दरवर्षी मोठया प्रमाणात होत असते.याचा परिणाम वातावरणात होत असून सध्याच्या घडीला या थंड माथेरानला उष्मा जाणवत आहे. याकामी नगरपालिका गटनेते शिवाजी शिंदे यांच्या संकल्पनेतुन प्रत्येक नगरसेवकांनी एक झाड लावून त्याचे उत्तम प्रकारे संगोपन करण्याचे सर्व लोकप्रतिनिधीना सूचित केल्याप्रमाणे मुख्य रस्त्यावर विविध जातीची एकूण २५ रोपे लावण्यात आली आहेत. या पावसाळ्यात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात येईल जेणेकरून म ाथेरानला पुन्हा गारवा आणि शुद्ध वातावरण निर्मिती होऊ शकते, असे विद्यमान नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी सांगितले आहे. या वृक्षारोपण कार्यक्रमात सर्वच लोकप्रतिनिधी तसेच नगरपालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## जी. एम. वेदक महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरू

**| तळा | प्रतिनिधी |**

श्री गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठान संचलित जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया उत्साहात सुरू झाली असून बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या या महाविद्यालयामध्ये गुणवत्तापूर्ण, आधुनिक व रोजगाराभिमुख अभ्यासक्रम उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांचा कल मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

महाविद्यालयामध्ये प्रवेश अर्ज व प्रॉस्पेक्टस विक्रीस सुरुवात झाली असून इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे यांनी केले आहे. महाविद्यालयाची विशेष ओळख म्हणजे अनुभवी, पीएच.डी. धारक तसेच SET/NET पात्र प्राध्यापक वर्ग विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शैक्षणिक मार्गदर्शन करीत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, राष्ट्रीय सेवा योजना, व्यक्तिमत्त्व विकास उपक्रम, करियर कट्टा आदी विविध कार्यक्रम नियमितपणे राबविले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास व सामाजिक जाणीव विकसित होत आहे.विद्यार्थ्यांना अत्याधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल क्लासरूम, वाय-फाय सुविधा तसेच स्वच्छ, सुंदर आणि प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेश समिती प्रभारी डॉ. परशुराम अभंगे, हर्षद सोनवणे, अवनी आंबुर्ले, कार्यालयीन अधीक्षक प्रणव मेकडे, निलेश पांढरकामे, सुजाता पवार आदी परिश्रम घेत आहेत. संस्थेचे डॉ. नंदकुमार वेदक, सचिव उन्मेश वेदक, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य, पुरुषोत्तम मुळे तसेच स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य व मार्गदर्शन लाभत आहे.

## आपटा गावाच्या मदतीसाठी आता टाटा मोटरचा सहभाग

**| आपटा | प्रतिनिधी |**

गावाच्या विकासासाठी व गावातील स्वच्छता आरोग्य पाणीपुरवठा महिला विकास अंगणवाडी व इतर काही खास बाबीसाठी टाटा मोटर्सनी आता आपटा गावाच्या विकासासाठी आपला सीआरएस फंडातून हातभार लावण्याचा निर्णय घेतला आहे

याबाबत टाटा मोटर्स सीआर एस फंडाच्या प्रतिनिधी अश्विनी शेळके यांनी गावातील ग्रामस्थांना मार्गदर्शन केले यावेळेला सरपंच व ग्रामविकास अधिकारी व ग्रामस्थ या मीटिंगला हजर होते ग्रामस्थांनी सांगितले की गावाच्या विकासासाठी आम्हाला पहिले सोलर पॉवरची मदत हवी आहे.

जी आमच्या गावाच्या पाणीपुरीसाठी गरजेचे आहे व हे काम लवकर व्हावे प्राधान्यने व्हावे, असे टाटा मोटर्सच्या प्रतिनिधी अश्विनी शेळके यांना विनंती केली आहे.

**स्पर्धेत बक्षिसांची होणार खैरात | तालुक्यात २५ शेतकरी गटांची नोंदणी**

## सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेची जय्यत तयारी

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

पाणी फाउंडेशन, कृषी विभाग व उमेद यांच्या संयुक्त विद्यमानाने उरण तालुक्यात सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. उरण तालुक्यात २५ गटांची नोंदणी करण्यात आली असून, ही स्पर्धा राज्यस्तरावर पार पडणार आहे.

यामध्ये शेतकऱ्यांना स्पर्धे विषयी मार्गदर्शन तसेच स्पर्धे विषयी काही अडचणी असतील तर हे कृषी अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत, विशेषता: या स्पर्धेत भाग घेण्यासाठी पानी फाउंडेशनच्या स्मार्ट शेती ॲपवर शेतकऱ्यांना नोंदणी करावी लागणार आहे.



गटात किमान ११ शेतकऱ्यांना सहभाग घेता येईल. भात भाजीपाला पिके व नाचणी या पिकांच्या गटांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आवश्यक क्षेत्र हे किमान दहा एकर असावे. गटातील कोणत्याही एका शेतकरी कुटुंबाचे स्पर्धेतील क्षेत्र हे गटातील एकूण क्षेत्राच्या ३० टक्क्या पेक्षा जास्त नसावे. विशेष म्हणजे रोपवाटिका तयार करण्यापूर्वी राब जाळू नये. अन्यथा जमिनीतील जिवाणूंच्या वसाहती नष्ट होतात. रोपवाटिका ही गादी वाफ्यावरच तयार करण्यात यावी. गादी वाफेवर रोपांची जोमदार वाढ होते. अतिवृष्टीतही रोपे सुरक्षित राहतात. गादीवाफे हे एक मीटर रुंदीचे व ८.१० सेंटीमीटर उंचीचे असावेत. गादीवाफेसाठी २०० किलो भाताच्या तुसाच्या राखेचा वापर करावा. चार गुंठ्याच्या रोपवाटिकेसाठी एक टन कुजलेले शेणखत द्यावे, अशी माहिती कृषी विभागामार्फत देण्यात आली.

या स्पर्धेसाठी विशेष बक्षीसांची खैरात होणार आहे. यात प्रथम क्रमांकाच्या मानकरी ठरणाऱ्या गटाला ५० लाख रुपयांचे बक्षीस प्रदान करण्यात येणार आहे. तर द्वितीय क्रमांकाच्या बक्षीसास पात्र ठरणाऱ्या गटाला ३० लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. तृतीय क्रमांकाच्या गटास २० लाख रुपयांचे बक्षीस दिले जाईल. त्याचबरोबर खास महिलांसाठी राज्यस्तरावर १० लाखांचे पहिल्या तीन क्रमांकासाठी विशेष बक्षीस ठेवण्यात आले आहे.

# महाडकरांचा जीवघेणा प्रवास

## रखडलेल्या पुलामुळे खाडीपट्ट्यातील नागरिक वाऱ्यावर



**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड मधील खाडीपट्ट्यातील हजारो नागरिकांसाठी पावसाळा हा सुखद नसून एक मजीवघेणा संघर्षफठरला आहे. सावित्री नदीवर उभारण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी मरावढळ पुलाफ्चे काम मागील नऊ वर्षांपासून धूळखात पडले आहे. २०२६ उजाडले तरी पुलाचे काम अपूर्णच असल्याने, प्रशासकीय नियोजनाचा अभाव आणि कंत्राटदाराची मनमानी चव्हाट्यावर आली आहे.

रावढळ पूल हा या भागातील नागरिकांसाठी जीवनवाहिनी ठरणार होता. हा प्रकल्प २०१९ मध्येच पूर्ण होणे अपेक्षित होते, परंतु सात वर्षे उलटूनही पुलाचे काम पूर्ण झाले नाही. नऊ वर्षांपासून हे काम रखडल्यामुळे स्थानिकांमध्ये प्रशासनाविषयी प्रचंड रोष निर्माण झाला आहे. कंत्राटदाराने कामात दाखवलेली दिरंगाई आणि त्याकडे प्रशासनाने केलेले दुर्लक्ष यामुळे हा पूल एक पांढरा हत्ती ठरत आहे.

पावसाळ्याच्या तोंडावर या परिस्थितीबाबत विचारणा केली असता, राष्ट्रीय महामार्ग उप-विभागाचे कनिष्ठ अभियंता अभिजित झेंडे यांनी दिलेली प्रतिक्रिया थक्क करणारी आहे. ठेकेदाराकडे मनुष्यबळाची कम तरता आहे, त्यामुळे काम थांबले आहे. त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

मात्र, पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण होणे अशक्य आहे, असे उत्तर देऊन प्रशासनाने आपल्या जबाबदारीतून हात झटकल्याचे दिसून येते. प्रशासनाचे हे धोरण स्थानिकांच्या जीवाशी खेळ करणारे असल्याचा आरोप होत आहे.

पुलाची कमी उंची आणि पावसाळ्यात सावित्री नदीला

- **रावंढळ पुलाचा ९ वर्षांचा वनवास**
- **महाडकर पुराच्या छायेखाली**

येणारा पूर यामुळे खाडीपट्ट्याचा मुख्य शहराशी असलेला संपर्क तुटणे ही आता एक वार्षिक नियती बनली आहे. रुग्ण, गरोदर माता आणि आपत्कालीन सेवांसाठी हा रस्ता एक मब्लॅक स्पॉटफ ठरला आहे. स्थानिक पत्रकार रघुनाथ भागवत यांनी याबाबत तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला. ते म्हणाले, एकीकडे एमआयडीसीच्या प्रदूषणाने सावित्री नदी पोखरली आहे, तर दुसरीकडे पायाभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिक कोंडीत सापडले आहेत. प्रशासनाने या नागरिकांना अक्षरशः बंदिस्त करून ठेवले आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच प्रशासनाचे हे अपयश समोर आल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

विकासकामांची ही धिंडवडे थांबणार कधी? आणि खाडीपट्ट्यातील नागरिकांना मुख्य प्रवाहात कधी सामावून घेणार? असे प्रश्न आता विचारले जात आहेत. जर प्रशासनाने युद्धपातळीवर उपाययोजना केल्या नाहीत, तर तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे. आता पावसाळ्याच्या काळात खाडीपट्ट्यातील नागरिकांचे हाल टळणार की आश्वासनांचा पाऊस पडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शेतकऱ्याने घेतले भेंडीचे उत्पादन

**। खांब । प्रतिनिधी ।**

देवकान्हे गावचे प्रगतशील शेतकरी नथुराम भोईर यांनी आपल्या शेती क्षेत्रात भेंडी पिकाचे बंम्पर उत्पादन घेतले आहे.

आपल्या शेती क्षेत्रात नेहमीच नाविण्यपूर्ण प्रयोग करून शेतीमध्ये भातशेती असो फळ शेती अथवा भाजीपाला पिकांची शेती असो.कृषीनिष्ठ व प्रगतशील शेतकरी नथुराम भोईर हे दरवर्षी नवनवीन प्रयोग करीत आले आहेत. यावर्षी त्यांनी आपल्या शेती क्षेत्रातील सुमारे दीड एकराच्या परिसरात चालू हंगाम तील मार्च महिन्यात संकरीत भेंडी बियाण्यांची लागवड करून बंम्पर पीक घेतले आहे. दीड एकराच्या परिसरात भेंडीचे पीक एवढे जोमदार आले आहे, की नथुराम भोईर यांचे कौशल्य व कसब यांची साहजिकच स्तुती केली जात आहे. दररोज निघणारी भेंडीची भाजी स्थानिक गावागावात व रोहा शहरात विक्रीसाठी पाठविली जात असल्याने आर्थिक नफाही चांगला मिळत आहे. सेंद्रिय खतांचा अधिकाधिक वापर व कोणत्याही प्रकारची रासायनिक फवारणी न करता चिकट टॅपर ठिकठिकाणी लावले असल्याने कृमी कीटक हे सहजपणे चिकट टॅपरकडे आकर्षित होत असल्याने पिकावर कोणत्याही प्रकारचा प्रादुर्भाव होताना दिसून येत नाही.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## पनवेल रेल्वे स्थानकातील समस्यांनी प्रवासी त्रस्त



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल रेल्वे स्थानकात सुरू असलेल्या विविध कामांमुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. स्थानक परिसरातील अपूर्ण सुविधा, धूळ, आवाज आणि सुरक्षेच्या अभावामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः अपंग नागरिकांना ब्रिजवरून उतरताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांच्यासाठी योग्य सुविधा उपलब्ध नसल्याची तक्रार प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

पनवेल स्थानकावरील प्लॅटफॉर्म पुढे नेण्यात आल्याने उन्हाच्या तडाख्यात प्रवाशांना लांब अंतर चालत जावे लागत आहे. प्लॅटफॉर्म ते ब्रिज दरम्यान कोणतेही संरक्षणात्मक शेड नसल्याने नागरिकांना उष्म्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गर्दीच्या वेळी प्लॅटफॉर्मवर मोठी धावपळ होत असून एखादा प्रवासी खाली पडून गंभीर अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानक परिसरात सुरू असलेल्या कामांमुळे सतत धूळ उडत असून आवाजाचाही त्रास होत आहे. दररोज हजारो प्रवासी या समस्यांमुळे त्रस्त असताना रेल्वे प्रशासन मात्र गंभीर दिसत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

## नवीन पनवेलमध्ये संघर्ष समितीची बैठक संपन्न

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

स्वायत्त महाराष्ट्र संघर्ष समितीची महत्त्वपूर्ण बैठक नवीन पनवेल येथील बांठीया शाळेमध्ये पार पडली. परप्रांतीयांच्या वाढत्या लोंढ्यांमुळे महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक रचनेवर गंभीर परिणाम होत असून, परप्रांतीय मुक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी राज्यघटनेच्या आर्टिकल १९ मध्ये दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत या बैठकीत सर्व उपस्थितांनी व्यक्त केले.

बैठकीदरम्यान आर्टिकल १९ मध्ये दुरुस्ती करण्याची गरज का आहे, तसेच महाराष्ट्रासाठी राज्याचा स्वतंत्र नागरिकत्व कायदा का असावा, याविषयी सविस्तर कायदेशीर व सामाजिक पैलूंवर माहिती देण्यात आली. स्वायत्त महाराष्ट्र संघर्ष समितीच्या माध्यमातून स्थानिकांचा रोजगार, मराठी भाषेचे संवर्धन आणि मराठी शाळांचे प्रश्न यांवर सातत्याने काम सुरू असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. परप्रांतीयांच्या लोंढ्यांमुळे नेमका काय परिणाम होत आहे, याचे दाहक वास्तव गावागावात जाऊन लोकांपर्यंत पोहोचवण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**

**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## सहाय्यक गट विकास अधिकारी अन् उपलेखापाल यांची परीक्षा

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र विकास सेवा अंतर्गत सहाय्यक गट विकास अधिकारी (गट-ब) या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तींना संबंधित पदावर कायम करण्यासाठी, तसेच जिल्हा परिषद सेवेतील उपलेखापाल पदावरील पदोन्नती व नामनिर्देशनासाठीच्या विभागीय परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे.

या परीक्षा दि. २५, २६ आणि २७ मे २०२६ रोजी पार पडणार असून, यासाठी नवीन पनवेल येथील एका प्रमुख परीक्षा केंद्राची निवड करण्यात आली आहे.महाराष्ट्र विकास सेवा सहाय्यक गट विकास अधिकारी या पदावरील उमेदवारांच्या स्थिरीकरणासाठीची परीक्षा २५, २६ आणि २७ मे या तीन दिवसांच्या कालावधीत घेतली जाईल. याच सोबतीने जिल्हा परिषद सेवेतील उपलेखापाल पदावर पदोन्नती मिळवण्यासाठी आणि नामनिर्देशनाव्दारे थेट नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठीची विहित परीक्षा २५, २६ आणि २७ मे या दिवसांत घेतली जाणार आहे. या दोन्ही महत्त्वाच्या परीक्षा नवीन पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात आल्या आहेत.

## नेरळ-कळंब रस्त्याचे काँक्रिटीकरण सुरू

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



माथेरान नेरळ कळंब या राज्यमार्ग रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्याचे काम शासनार हाती घेतले आहे.या रस्त्यावर धामोते पासून कोदीवले पर्यंत रस्ता पहिल्या टप्प्यात सिमेंट काँक्रिटीकरण करून तयार होणार आहे.या भागातील काँक्रिटीकरण कामाला सुरुवात झाली असून पावसाळ्यात चांगला रस्ता उपलब्ध होणार आहे.

माथेरान नेरळ कळंब हा राज्यमार्ग रस्ता काँक्रीटचा बनविला जाणार आहे.या रस्त्यावरील नेरळ रेल्वे फाटक पासून युवराज सोसायटीपर्यंत पहिला टप्पा तर त्यानंतर धामोते गावच्या तबेला पासून कोदीवले येथे रस्ता बनविण्यासाठी खोदकाम करण्यात आले होते. रस्त्याचे रुंदीकरण आणि रस्त्याच्या आजुबाजूला संरक्षण भिंती बांधण्याची कामे सुरू करण्यात आहेत. पूर्वीचा डांबरीकरण रस्ता खोदून नंतर त्यावर सिमेंट काँक्रिटीकरण अशा स्वरूपातील हा रस्ता असणार आहे.या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी डांबरी भाग काढून मातीचा रस्ता राहिला होता.रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी संरक्षण भिंत बांधण्यासाठी रस्ता खोदण्यात आला होता.त्या दिवसापासून रस्त्यावरील मातीचा मोठा त्रास वाहनचालक यांना होत होता. या रस्त्यावरून होणारी वाहतील दिवसभर सुरू असते आणि त्यामुळे या वाहतुकीला धामोते ते कोदिवले या भागातील मातीचा भाग यामुळे होणारी धूळ प्रचंड त्रासदायक ठरली होती.

धामोते कोदीवले मातीच्या रस्त्यावर काँक्रीटचा पहिला थर टाकण्यात आला आहे. या थरामुळे रस्त्यावरील वाहनचालक यांना होणारी धुळीचा त्रास थांबला आहे.रस्त्यावरील वाहतुकीचा ताण यामुळे वाहनचालक यांच्याकडून काँक्रिटीकरण लवकर करावे, असा तगादा लावला जात होता. शेवटी नेरळ कळंब रस्त्यावरील धामोते पासून कोदीवलेपर्यंत रस्त्यावर काँक्रिटीकरण करण्यासाठी पहिला थर टाकण्यात आला होता. त्याचवेळी रस्त्यावरून टँकरमधून पाणी मारण्याची कामे सातत्याने सुरू असल्याने काँक्रीटचा पहिला थर अधिक मजबूत होऊ शकतो. त्याचवेळी रस्त्यावरील मातीचा आणि धुळीचा त्रास थांबला आहे. आता या रस्त्यावरील मुख्य काँक्रिटीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे बोरगाव, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रू.पै. |
|---|---|---|
| ११८ | एकूण क्षेत्र ०-९७-१० हे.आर, यापैकी अरविंद मोहनलाल जैन याचे मालकीचे खाते क्र. ११३ ज्याचे क्षेत्र ०-५७-०० हे.आर.या जमीन मिळकतीबाबत | ४.१६ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही

दिनांक :- २५/०५/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड
पिन नं.४०२१०७

## ‘बोव्हाईन ब्रिडींग ॲक्टची प्रभावी अंमलबजावणी करा’

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्य शासनाने महाराष्ट्र गोजातीय प्रजनन अधिनियम, २०२३ लागू केला आहे. मात्र, अद्यापही क्षेत्रीय स्तरावरील खाजगी कृत्रिम रेतन सेवादाता व संस्थांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी केली नसल्याची बाब समोर आली असल्याने संबंधितांवर या अधिनियमांतर्गत नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत.

राज्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली आहे. उत्तम दर्जाच्या वळूंचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे आणि प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना आळा घालणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. या कायद्यांतर्गत राज्यातील सर्व रेत केंद्रे, भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादारांना प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक असून त्यांना केवळ प्रमाणित व उच्च वंशावळीच्या वळूंचेच रेत प्रजननासाठी वापरता येईल. या सर्व प्रक्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. प्राधिकरणाला केंद्रांची तपासणी, झडती व नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. कायद्यातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई व दंडाची तरतूद करण्यात आली असल्याने संभाव्य कारवाई टाळण्यासाठी संबंधितांनी प्राधिकरणाकडे लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन यांनी केले आहे.

दोष सिद्ध झाल्यावर एक लाखपर्यंत दंड आकारण्यात येईल. नोंदणी प्रमाणपत्रानुसार मंजूर सेवांबाबत चुकीची दिशाभूल करणारी जाहिरात किंवा प्रसिद्धी केल्यास, दोष सिद्ध झाल्यावर ६ महिन्यांपर्यंत साधा कारावास किंवा २ लाखपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. फक्त प्रमाणित व अधिकृत विर्यामात्रांचाच वापर करा, सेवा घेण्यापूर्वी तंत्रज्ञाचा नोंदणी क्रमांक तपासावा.

## पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल** : पनवेल परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. एक अनोळखी इसम उंची अंदाजे ५ फुट, चॉकलेटी रंगाची मळकटलेली हाप पॅन्ट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे बापळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) विद्या शामराव चव्हाण २) दिनेश शिवलाल राठोड यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| बापळे, ता. अलिबाग | १७४ | ०-२४-९० जिरायत<br>०-००-०० पो.ख.<br>०-२४-९० एकुण | ६.०६ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक- २४/०५/२०२६

**ॲड. विराज शरद अंबुकर**
मु. हनुमान वाडी, थेरोंडा, पो. चौल,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. क्र. ९०२८८५१२८०

**पावसाळी हंगामात तिकीट दरात २५ रुपयांची वाढ | प्रवासी वाहतूक ३१ ऑगस्टपर्यंत बंद**

# मोरा-भाऊचा धक्का सागरी प्रवास महागणार

**। उरण । प्रतिनिधी ।**



मोरा- भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकिट दरात २६ मे पासून पावसाळी हंगामासाठी २५ रुपयांची वाढ करण्यात येणार आहे. पावसाळी हंगामासाठी दरवाढ होणार असल्याने सागरी प्रवास ८० रुपयांवरुन १०५ रुपयांपर्यंत महागणार आहे. तर पावसाळी हंगामात भाऊचा धक्का -रेवस दरम्यानची प्रवासी वाहतूक २६ मे पासून ३१ ऑगस्टपर्यंत बंद करण्यात येणार आहे.

दरवर्षी पावसाळी हंगामात मोरा- भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकिट दरात भरमसाठ वाढ केली जाते.यावर्षीही मुंबई जलवाहतूक औद्योगिक सहकारी संस्थेने पावसाळी हंगामासाठी तिकिट दरात ८० रुपयांवरुन थेट १०५ रुपयांपर्यंत वाढ करण्यात येणार आहे.हाफ तिकिट दरातही

३९ रुपयांवरुन ५२.५० रुपयांपर्यंत म्हणजे १३.५० रुपयांची वाढ करण्यात येणार आहे.ही तिकीट दरवाढ फक्त पावसाळी हंगामासाठी २६ मे पासूनच ३१ ऑगस्टपर्यंत तीन महिन्यांपुरतीच लागु करण्यात येणार असल्याची माहिती मुंबई जल वाहतूक संस्थेचे सेक्रेटरी शराफत मुकादम यांनी दिली. पावसाळी हंगामासाठी या तिकिट दरवाढीची मंजुरी मेरिटाईम बोर्डाकडून याआधीच घेण्यात आली असल्याची माहिती मुंबई भाऊचा धक्का बंदर निरिक्षक सुशिल साटेलकर यांनी दिली.

मोरा-भाऊचा धक्का हा सागरी मार्ग प्रवासी वाहतुकीसाठी अत्यंत फायदेशीर, सुखद आणि शार्टकट म्हणून ओळखला जातो.वाहतुक कोंडीची दगदग नसल्याने या सागरी मार्गावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे.त्याशिवाय दरवर्षी पावसाळी हंगामात गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा-अलिबाग, भाऊचा धक्का ते रेवस या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूकही बंद ठेवण्यात येते. त्यामुळे मांडवा-अलिबागकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोरा- भाऊचा धक्का या सागरी मार्गावर गर्दी वाढते. मात्र तिकीट दरवाढी नंतरही प्रवाशांच्या सुविधांमध्ये वाढ व्हावी, प्रवाशांच्या नशिबात गळक्या प्रवासी बोटी येणार नाहीत.

# निवडक



## भारतीय महिला संघ इंग्लंडला रवाना

**नवी दिल्ली :** भारतीय महिला क्रिकेट संघ शनिवारी (दि.२४) टी-२० विश्वकरंडकासाठी इंग्लंडला रवाना झाला आहे. इंग्लंड व वेल्स या देशांमध्ये १२ जून ते ५ जुलै यादरम्यान टी-२० विश्वकरंडकाचा थरार रंगणार आहे. भारताचा महिला संघ त्याआधी यजमान इंग्लंडविरुद्ध तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. या लढती अनुक्रमे २८ मे, ३० मे व २ जून रोजी होणार आहेत. भारतीय संघाचा 'अ' गटात समावेश असून, या गटामध्ये भारताला ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, नेदरलँड्स, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका या देशांचा सामना करायचा आहे. भारतीय महिला संघाचा सलामीचा सामना दि.१४ जून रोजी पाकिस्तानशी होणार आहे. भारताच्या महिला संघात हरमनप्रीत कौर, स्मृती मानधना, शेफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्ज, भारती फुलमाळी, दीप्ती शर्मा, रिचा घोष, श्री चरणी, यास्तिका भाटीया, नंदनी शर्मा, अरुंधती रेड्डी, रेणूका सिंग, क्रांती गौड, श्रेयांका पाटील व राधा यादव यांचा समावेश आहे.

## राम चरणने मागितली माफी



**नवी दिल्ली :** राम चरण आणि जान्हवी कपूर यांची मुख्य भूमिका असलेला स्पोर्ट्स ड्रामा 'पेद्दी' चित्रपटाचा भव्य संगीत प्रकाशन सोहळा भोपाळमध्ये पार पडला. एका संवादादरम्यान, राम चरणला भारतीय क्रिकेटपटूंचे थोडक्यात वर्णन करण्यास सांगितले. यावेळी राम चरणने सचिन तेंडुलकरच्या कारकिर्दीला 'एक दिर्घ दिग्गज प्रवास', एमएस धोनीचे वर्णन 'शांत आणि संयमी', रोहित शर्मा 'सर्वांचा माणूस', विराट कोहलीला 'फायर' असे वर्णन केले. यावेळी त्याने जसप्रीत बुमराहबद्दलही म्हटले, त्यामुळे चर्चा सुरू झाली. त्याने बुमराहचे वर्णन करताना तो त्याचा सर्वात मोठा चाहता आहे; मात्र, त्याचे कौतुक करताना चुकून त्याने क्रिकेट आणि फुटबॉल यांची सरमिसळ केली. त्याच्या या वक्तव्याची क्लिप लगेचच व्हायरल झालीराम चरणने नंतर सोशल मीडियामार्फत झालेल्या चुकीची माफी मागितली. याबाबत त्याने त्याच्या अधिकृत एक्स अकाऊंटवर लिहिले की, मला कधीकधी नावे लक्षात ठेवण्याचा खरोखरच खूप विसर पडतो. झालेल्या गोंधळाबद्दल जसप्रीत बुमराह यांची मी क्षमा मागतो. त्या सर्व उत्साहाच्या आणि गर्दीच्या गदारोळात झालेली ही एक अगदीच स्वाभाविक मानवी चूक होती. मी तुमचा मनापासून आदर करतो आणि तुमच्या खेळाचा मी एक मोठा चाहता आहे. जेव्हा तुम्ही फलंदाजांना सातत्याने बचावात्मक पवित्रा घेण्यास भाग पाडता.

## अंतिम सामन्याची रंगत शिगेला

**मुंबई :** दादरच्या शिवाजी पार्क परिसरातील पार्क क्लबच्या अर्बन स्पोर्ट टर्फवर मुंबई महापौर चषक इनडोअर क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेच्या अंतिम सामन्याची रंगत शिगेला पोहोचली आहे. पहिल्या उपांत्य सामन्यात ऑसम अंधेरी इनडोअर क्रिकेट क्लबने ओर्नेट क्रिकेट क्लबवर ४९-४५ असा विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना ओर्नेटच्या आकाश आणि रजनीश यांनी २४ धावांची दमदार सुरुवात केली. त्यानंतर अभिजित आणि कमलेश यांनी १४ धावा जोडल्या, तर अक्षिश आणि अश्विन यांनी १२ धावांची भर घातली. मात्र, शेवटच्या जोडीतील घसरणीमुळे ओर्नेटला ४५ धावांपर्यंतच मजल मारता आली. ४६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑसम अंधेरीकडून मोनू आणि मयांक यांनी १७ धावांची सुरुवात केली. त्यानंतर रोहित आणि अहमद यांनी १८ धावा फटकावत संघाला विजयाच्या उंबरठ्यावर नेले. शेवटच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या सामन्यात ऑसम अंधेरीने ४९ धावा करत अंतिम फेरीत धडक मारली. दुसऱ्या उपांत्य सामन्यात एसएसएच्या पहिल्या जोडीतील नितीश आणि सिकंदर यांना खातेही उघडता आले नाही. त्यानंतर विल्सन आणि विजय यांनी १४ धावा केल्या, तर नितीन आणि विश्वनाथ यांनी २९ धावांची आक्रमक भागीदारी केली. मात्र, शेवटच्या जोडीतील सुयोग आणि संदेश यांना श्रेयस आणि शुभम यांच्या अचूक गोलंदाजीसमोर मोठा फटका बसला आणि संघ २८ धावांवर रोखला गेला. लक्ष्याचा पाठलाग करताना अनिकेत माडीये आणि रोहन गावडे यांनी १५ धावांची सावध सुरुवात केली. त्यानंतर श्रेयस वैद्य आणि अजित सेठी यांनी १० धावांची भर घालत विजयाचा पाया मजबूत केला. कर्णधार ओमकार पाटोळे आणि प्रसाद आंब्रे यांनी संघाला विजयाच्या जवळ पोहोचवले. अखेरीस शुभम गुरव आणि सिद्धेश घोगरे यांनी ७ महत्त्वाच्या धावा जोडत संघाला १४ धावांनी शानदार विजय मिळवून दिला.

# पंजाब किंग्जचा 'जायंट' विजय





### श्रेयस अय्यरचा ऐतिहासिक विक्रम

आयपीएलच्या इतिहासात चौथ्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना शतक झळकावणारा श्रेयस अय्यर हा पहिलाच कर्णधार ठरला आहे. यापूर्वी, आयपीएलमधील कर्णधारांनी एकूण १६ शतके झळकावली होती; परंतु, ती सर्व शतके त्यांनी फलंदाजीच्या पहिल्या तीन क्रमांकांवर खेळतानाच पूर्ण केली होती. मधल्या फळीत फलंदाजी करताना शतक झळकावण्याचा हा विक्रम आयपीएलच्या इतिहासात पहिल्यांदाच घडला आहे. श्रेयस अय्यरने नाबाद ५१ चेंडूत ११ चौकार व पाच षटकारांसह १०१ धावा ठोकल्या. शिवाय, श्रेयस आता केएल राहुल आणि ॲडम गिलख्रिस्ट यांच्यासारख्या मोजक्या खेळाडूंच्या यादीत सामील झाला आहे. पंजाब किंग्जचे कर्णधारपद भूषवताना शतक झळकावणारा तो केवळ तिसराच फलंदाज ठरला आहे. यापूर्वी, २०११ मध्ये गिलख्रिस्टने आणि २०२० मध्ये राहुलने ही कामगिरी करून दाखवली होती.

**| लखनऊ | वृत्तसंस्था |**

यंदाच्या आयपीएल हंगामातील शनिवार दि.२३ मे हा दिवस श्रेयस अय्यरसाठी एक ऐतिहासिक दिवस ठरला आहे. पहिल्या सात सामन्यांत अपराजित राहणाऱ्या पंजाब किंग्जचे नेतृत्व करताना, श्रेयसने लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या एका महत्त्वपूर्ण सामन्यात आपल्या संघाला ७ गडी राखून शानदार विजय मिळवून दिला. तसेच, त्याने आयपीएलच्या इतिहासात १९ हंगामांमध्ये कोणत्याही कर्णधाराला साध्य करता आला नव्हता, असा एक विक्रम प्रस्थापित केला आहे. त्याने अवघ्या ५१ चेंडूंमध्ये नाबाद १०१ धावांची धडाकेबाज शतकी खेळी साकारली. तसेच, त्याला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

लखनऊच्या एकाना स्टेडियमवर पार पडललेया या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सने शेवटच्या साखळी सामन्यात पंजाब किंग्ज समोर १९७ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले. अर्शीन कुलकर्णी (०) व निकोलस पूरन (२) हे अपयशी ठरल्यानंतर जॉश इंग्लिस व आयुश बडोनीने दमदार खेळ केला. या दोघांनी ४९ धावांची भागीदारी केली, त्यात आयुषच्या ४३ धावांचा समावेश होता. रिषभ पंत (२६) याला मोठी खेळी खेळण्यात पुन्हा अपयश आले. तेच अब्दुल समदने ३७ धावांची नाबाद खेळी केली. त्यानंतर इंग्लिस ७२ धावांची खेळी करताना संघाला त्याने ६ बाद १९६ धावांपर्यंत पोहोचवले. यावेळी पंजाबच्या मार्को यान्सेन व युझवेंद्र चहल यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

### शतकाच्या जोरावर यशस्वी पाठलाग

लक्ष्याचा पाठलाग करताना लखनऊच्या मोहम्मद शमीने पंजाब २२ धावांवर असतातना प्रियांश आर्याला शून्यावर, तर कूपर कॉनली (१८) याला त्रिफळाचीत केले. यानंतर प्रभसिमरन सिंगने अर्धशतक झळकावून कर्णधार श्रेयस अय्यरसह शतकी भागीदारी केली. श्रेयसनेही ३३ चेंडूंत पन्नास धावा पूर्ण केल्या. त्यानंतर दोनवेळा जिवदान भेटलेलो प्रभसिमरन ३९ चेंडूंत ६९ धावांवर अर्जुन तेंडूलकरच्या तिसऱ्या षटकात भन्नाट यॉर्कवर पायचीत होऊन बाद झाला. त्यानंतर पंजाबला ३० चेंडूंत ३५ धावांची गरज असताना श्रेयसने हात मोकळे करताना शमीच्या षटकात २० धावा कुटल्या. यावेळी श्रेयसने ५१ चेंडूंत आयपीएलमधील त्याचे पहिले शतक पूर्ण केले. त्याने नाबाद १०१ धावांसह पंजाबला १८ षटकांत ३ बाद २०० धावा करून विजय मिळवून दिला.

## क्रीडा प्रशासन कायद्याला मंजुरी

**| कोलकता | वृत्तसंस्था |**



अखिल भारतीय फुटबॉल संघटनेने राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायद्याला मंजुरी दिली आहे. एआयएफएफची विशेष सर्वसाधारण बैठक शनिवारी (दि.२४) पार पडली. या बैठकीत नव्या कायद्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. मात्र, इंडियन सुपर लीग (आयएसएल) साठी नवीन व्यावसायिक भागीदार निवडण्याचा निर्णय पुढे ढकलण्यात आला. ही बैठक एआयएफएफचे अध्यक्ष कल्याण चौबे यांच्या अध्यक्षतेखाली कोलकतामध्ये झाली. बैठकीला १९ कार्यकारी समिती सदस्य, ३२ राज्य संघटनांचे प्रतिनिधी तसेच फिफा आणि आशियाई फुटबॉल संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते. एआयएफएफकडून सांगण्यात आले की, सर्वसाधारण सभेमध्ये एकमताने राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा स्वीकारण्याचा निर्णय घेतला.

## उन्हाळी क्रीडा प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**| रोहा | प्रतिनिधी |**



क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत तालुका क्रीडा संकुल समिती धाटाव येथे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण शिबिराला तालुक्यातील खेळाडू व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

या प्रशिक्षण शिबिरामध्ये कबड्डी, व्हॉलिबॉल, बॅडमिंटन, कराटे, लाठीकाठी, उशू व मैदानी खेळ इत्यादी विविध क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली दिले जात आहे. सकाळ व सायंकाळच्या सत्रांमध्ये मोठ्या संख्येने खेळाडू सहभागी होत असून, शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच खेळातील कौशल्य विकसित करण्यावर विशेष भर दिला जात आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ व रोहा तालुका क्रीडा अधिकारी अंकित मयेकर यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा प्रशिक्षण देण्यासाठी तज्ज्ञ प्रशिक्षक रविंद्र कान्हेकर, राकेश पाटील, राकेश म्हसकर, अमित दळवी, विशाल गोवर्धने, रंजित रेवाळे, सिद्धी रेवाळे, कुणाल मालुंजकर, अमित घरत, श्रीकांत कांबळे, रोहन शेवाळे व धृती लाड हे काम पाहत आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयी आवड निर्माण करून त्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामुळे युवा खेळाडूंना आपली प्रतिभा सादर करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. प्रशिक्षणादरम्यान शिस्त, संघभावना आणि क्रीडा संस्कार यांचे महत्त्वही विद्यार्थ्यांना पटवून दिले जात आहे. तालुका क्रीडा संकुल समितीच्यावतीने शिबिरासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

## कुंडलिकेच्या तीरावर कबड्डीचा थरार



**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील कुंडलिका नदीच्या तीरावर ायगड जिल्हा धनगर समाज प्रीमियर लीग पुरुष व महिलांच्या भव्य जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. गाझी शेख सलाऊद्दीन दर्गा मैदानात रविवारी (दि.२४) पहाटेपर्यंत सुरू राहिलेली ही स्पर्धा मोठ्या खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी पुरुष गटाच्या अंतिम स्पर्धेत टिटवीचा राजा या संघाने, तर मुलींच्या स्पर्धेत इंदरदेव या संघाने विजेतेपद पटकावले आहे. अनुभवी आणि होतकरू तरुण आणि तरुणींचा कबड्डीचा थरार पाहण्यासाठी जिल्ह्यातील शेकडो प्रेक्षकांनी हजेरी लावली होती.

जिल्हा धनगर समाज प्रीमियर लीगच्या पुरुष गटात एकूण ९ संघानी आपला सहभाग नोंदवला होता. स्पर्धेच्या अंतिम सामना यारी दोस्ती व टिटवीचा राजा या संघात पार पडला. यावेळी टिटवीचा राजा या संघाने यारी दोस्ती संघाचा पराभव करत प्रथम क्रमांकावर आपले नाव कोरले. या विजेत्या संघाला मान्यवरांच्या हस्ते ४० हजार रुपये व आकर्षक चषक देऊन सन्मानित करण्यात आले. तर, उपविजेता दोस्ती यारी संघाला ३० हजार रुपये व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच, तृतीय क्रमांक ठरलेल्या स्काय वॉरीयर्स संघाला २० हजार रुपये व चषक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मालिकावीर प्रणय वरक, उत्कृष्ट पक्कड नितीन होगडे, तर उत्कृष्ट चढाई म्हणून अर्जुन आखाडे यांना सन्मानित करण्यात आले.

तर, मुलींच्या स्पर्धेत एकूण ४ संघानी सहभाग घेतला होता. स्पर्धेतील अंतिम सामना इंदरदेव व कागद गोयंडा या संघात खेळवला गेला. यावेळी इंदरदेव या संघाने बाजी मारली. या विजेत्या संघाला ५ हजार रुपये व आकर्षक चषक, तर उपविजेता कागद गोयंडा या संघाला ३ हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत मालिकावीर म्हणून सुप्रिया काळे, उत्कृष्ट चढाई हर्षली वरक व उत्कृष्ट पक्कड म्हणून अपर्णा वरक यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. दरम्यान, मुलींच्या सामन्याच्या उद्घाटन व बक्षीस समारंभ प्रसंगी समाज जिल्हाध्यक्ष चंद्रकांत ढेबे, उपाध्यक्ष चंद्रकांत हिरवे, रविंद्र झोरे, दत्तात्रय झोरे, गणेश होंगडे, राजू शिंगाडे, ठकूराम झोरे, तुकाराम वरक आदी मान्यवर व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रिषभ पंतचे कर्णधारपद धोक्यात?

**| लखनऊ | प्रतिनिधी |**



आयपीएलचा यंदाचा हंगाम लखनऊ सुपर जायंट्ससाठी फारसा चांगला ठरलेला नाही. रिषभ पंतच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या या संघाने हंगामातील आपले सर्व १४ साखळी सामने खेळले असून, त्यामध्ये त्यांना केवळ ४ सामने जिंकण्यात यश आले. त्यामुळे यंदा आयपीएलच्या स्पर्धे तून प्लेऑफमधून बाहेर पडणारा लखनऊ हा पहिला संघ ठरला आहे. त्यामुळे संघात मोठे फेरबदल होण्याची शक्यता आहे.

जागतिक क्रिकेट संचालक टॉम मूडी यांनी संघ अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरल्याचे मान्य केले असून, भविष्यातील नेतृत्वाबाबत गंभीर चर्चा होण्याचे संकेत दिले आहेत. मोठ्या अपेक्षांसह स्पर्धेत उतरलेल्या लखनौ संघाला संपूर्ण हंगामात केवळ ४ सामन्यांत विजय मिळवता आला आणि ते गुणतालिकेत तळाशी राहिले आहेत. हा हंगाम संघाच्या सर्वात खराब हंगामांपैकी एक ठरला आहे. शनिवारी (दि.२३) झालेल्या सामन्यानंतर पंजाब किंग्सकडून झालेल्या पराभवावर बोलताना टॉम मूडी यांनी मान्य केले की, कर्णधार रिषभ पंतला नेतृत्वाचा दबाव झेलणे कठीण जात होते आणि त्याचा परिणाम त्याच्या फलंदाजीवरही झालो. कर्णधारपदाच्या दृष्टिकोनातून पाहिले तर त्याच्यासाठी हा हंगाम खूप आव्हानात्मक ठरला. हे संपूर्ण हंगामातील निकालांमधून स्पष्ट दिसून आले. आम्ही यावर विचार करू, वेळ घेऊ आणि संपूर्ण परिस्थितीचे चिंतन करू, असे टॉम मूडी पंजाब किंग्सविरुद्धच्या पराभवानंतर पत्रकार परिषदेत म्हणाले. त्यामुळे पुढच्या वर्षी लखनऊ सुपर जायंट्समध्ये नवा कर्णधार आणि नव्या स्वरूपाचा संघ पाहायला मिळू शकण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## काजल साळुंखेची चाचणी शिबिरासाठी निवड

**| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |**



रायगड जिल्हा क्रिकेट असो. ची महिला क्रिकेटपटू काजल साळुंखे हिची निवड महाराष्ट्र महिला वरिष्ठ गटाच्या अंतिम संघ निवडण्यासाठीच्या शिबिरासाठी करण्यात आली आहे. काजल साळुंखे हि महाडची रहिवासी असून एसबीसी क्रिकेट अकॅडमीमध्ये क्रिकेटचे प्रशिक्षण घेत आहे. रायगडच्या महिला संघासाठी खेळतांना काजल हिने उत्तम खेळाचे प्रदर्शन केले असून, तिने केलेल्या उत्तम कामगिरीच्या जोरावर तिची निवड एमसीएच्या निवड चाचणी शिबिरासाठी करण्यात आली आहे. या आधी एसबीसी क्रिकेट अकॅडमीची खेळाडू रोशनी पारधी हिची निवड महाराष्ट्र महिला क्रिकेट असो.च्या १५, १९, २३ व वरिष्ठ गटाच्या संघात करण्यात आली आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असो.चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी दोन्ही मुलींचे अभिनंदन केले आहे.

## मेलबोर्न क्लबचा पराभव

**| पुणे | प्रतिनिधी |**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटने तर्फे सदू शिंदे साखळी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत श्री क्रिकेट क्लबने मेलबोर्न क्लबचा आठ गडी राखून पराभव केला. वडकी येथील रॉक २७ क्रिकेट मैदानावर झालेल्या लढतीत प्रथम फलंदाजी करणाऱ्या मेलबोर्न क्लबचा डाव १२५ धावांत आटोपला. प्रत्यूत्तर देताना श्री क्रिकेट क्लबने २ बाद १३० धावा करून विजय मिळविला. यावेळी शरण हारलेने नाबाद ४७ धावांची, तर अर्जुन वाघने ४४ धावांची खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.

### अर्बन स्पोर्ट टर्फवर मनोरंजनाची मेजवानी | वियोम फाऊंडेशनचा दमदार विजय

## मुंबई महापौर चषकाची दणक्यात सुरुवात

**| मुंबई | प्रतिनिधी |**



दादर येथील पार्क क्लबच्या अर्बन स्पोर्ट टर्फवर महापौर चषक इनडोअर क्रिकेट स्पर्धेची सुरूवात झाली आहे. या स्पर्धेने पहिल्याच दिवशी क्रिकेटप्रेमींना थरार, वेग आणि भन्नाट मनोरंजनाची मेजवानी दिली. महामुंबई इनडोअर क्रिकेट स्पोर्ट्स असो.च्यावतीने आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन आ. सुनील शिंदे व माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्या हस्ते पार पडले.

इनडोअर क्रिकेटमध्ये एका वेळी मैदानावर ८ खेळाडू खेळतात. प्रत्येक जोडीला २ षटके फलंदाजी करावी लागते, तर प्रत्येक खेळाडूला १ षटक गोलंदाजी करणे बंधनकारक असते. विशेष म्हणजे, फलंदाज बाद झाल्यास संघाच्या खात्यातून ५ धावा वजा होतात. त्यामुळे प्रत्येक चेंडूवर सामना रंगतदार होताना दिसला.

प्रथम फलंदाजी करताना मीडिया टिमच्या अंकुश धावरे व किरण महनवर यांनी १६ धावांची पायाभरणी केली. त्यावेळी रोहन व ओमकारने दोन्ही फलंदाजांना १-१ वेळा बाद केले. दुसऱ्या जोडीतील सिद्धेश कानसे व निकुंज नाटेकर यांना फक्त ४ धावांचीच भर घालता आली. यावेळी कुशने दोन्ही फलंदाजांना १-१ वेळा बाद केले. तर, प्रसादाने निकुंजला एकदा बाद केले. तिसऱ्या जोडीतील अतुल लोके व अन्वय सावंत यांनी १२ धावांची भर घातली. यावेळी अजितने दोन्ही फलंदाजांना १-१ वेळा बाद केले. तर, शेवटच्या जोडीतील गणेश पुराणिक व कर्णधार रोहित नाईक यांना आणखी १० धावा केल्याने संघाला ४२ धावांपर्यंत मजल मारता आली.

लक्ष्याचा पाठलाग करताना वियोम फाऊंडेशनच्या श्रेयस वैद्य व खुश शहा याना ५ धावाच करता आल्या. गणेशने श्रेयसला एकदा तर सिद्धेशने दोन्ही फलंदाजांना १-१ वेळा बाद केले. दुसऱ्या जोडीतील रोहन गावडे व अजित सेठी यांनी दमदार भागीदारी करत २० धावा केल्या. रोहनला अन्वयने एकदा बाद केले. तिसऱ्या जोडीतील अनिकेत माडीये व प्रसाद आंब्रे यांनी ३२ धावा कुटल्या. तर, शेवटच्या जोडीतील कर्णधार ओमकार पाटोळे व सुभम गुरव यांनी २५ धावांची भागीदारी करत संघाला ८२ धावांपर्यंत नेले आणि ४० धावांनी शानदार विजय मिळवून दिला.

## बंगळुरू, गुजरात 'क्वालिफायर'

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**




आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धा आता मावळतीकडे झुकली असून, साखळी फेरीच्या अखेरच्या टप्प्यात प्ले ऑफचे चित्र जवळपास स्पष्ट झाले आहे. शुक्रवारी सनरायझर्स हैदराबादने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला पराभूत करत १८ गुणांची कमाई केली. मात्र, सरस नेट रनरेटच्या जोरावर बंगळुरूने गुणतालिकेत अव्वल स्थान कायम राखले. त्यामुळे आता २६ मे रोजी धर्मशाळा येथे बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात क्वालिफायर-१ रंगणार आहे. बंगळुरू आणि गुजरात या दोन्ही संघांचे १८-१८ गुण आहेत. मात्र, ००.७८३ नेट रनरेटमुळे बंगळुरू अव्वल स्थानी आहे. गुजरात दुसऱ्या क्रमांकावर कायम आहे. त्यामुळे दोन्ही संघांचा क्वालिफायर-१ मधील प्रवेश निश्चित झाला आहे. या सामन्यात पराभूत होणाऱ्या संघालाही अंतिम फेरीत पोहोचण्याची आणखी एक संधी मिळणार आहे. दरम्यान, हैदराबादने बंगळुरूवर ५५ धावांनी दणदणीत विजय मिळवला होता. मात्र, टॉप-२मध्ये पोहोचण्यासाठी त्यांना ९१ धावांनी विजय आवश्यक होता. त्यामुळे शानदार विजय मिळूनही हैदराबादला तिसऱ्याच स्थानावर समाधान मानावे लागले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)